





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०६.०१.२०२५ | अंक नं. २५९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020







# अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर तसेच बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेच्या मागण्यांसाठी दिल्लीगेट येथे आंदोलन

नगर - बांगलादेशातील इस्कॉनचे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रम्हचारी यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. चिन्मय कृष्णदास हे बांगलादेशातील हिंदू समाजाचे प्रतिनिधीत्व करत होते व तेथील अल्पसंख्यांकांच्या हक्कासाठी शांततापूर्ण मार्गाने आवाज उठवत होते. ही घटना अत्यंत दुःख व खंत व्यक्त करणारी असून, स्वामी चिन्मय कृष्णदास यांची त्वरित सुटका करण्यात यावी याचबरोबर पुणतांबा (जि. अहिल्यानगर) या ठिकाणी महादेवाच्या मूर्तीची विटंबना करण्यात आली. पुणतांबा येथे एकाच महिन्यात ही दुसरी घटना असून १३ डिसेंबर रोजी हनुमान मंदिरात तर २३ डिसेंबर रोजी महादेव मंदिरात मूर्तींची विटंबना करण्यात आली. या घटनेचा लवकरात लवकर तपास करून दोर्षीवर कडक कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अहिल्यानगर येथील दिल्लीगेट येथे साय. ५ ते ६ या वेळेत हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने राष्ट्रीय हिंदू आंदोलन घेण्यात आले. या वेळी जय श्रीराम, हर हर महादेव अशा घोषणाही देण्यात आल्या.



अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर तसेच बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेच्या मागण्यांसाठी दिल्लीगेट येथे आंदोलन करताना हिंदुत्ववादी संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते.

या आंदोलनाला दिगंबर गेंट्याल, छावा युवा मराठा महासंघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकर गोरे, अधिवक्ता नामदेव जायभाय, मंदिर महासंघाचे गणेश पलंगे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हाप्रमुख व अहिल्यानगर जिल्हा हिंदू संघटक बापू ठाणगे, भाजप महिला आघाडीच्या सौ. सुरेखा विद्ये, सनातन संस्थेचे विनायक बत्तीन, हिंदू जनजागृती समितीचे परमेश्वर गायकवाड, संतोष गवळी, यश जाधव, बालाजी रायपेल्ली, ओंकार जेटला, किशोर भागानगरे, गणेश वाळुंजकर आदींसह विविध संघटनांचे ३५ हुन अधिक हिंदुत्ववादी उपस्थित होते.

### भारत सरकारने तात्काळ निर्णय घेऊन उपाययोजना करावी : नामदेव जायभाय

सध्या आपण पहातो, मंदिरावर हल्ले होतात, हिंदूंचे धर्मांतरण होते, ही गोष्ट गंभीर आहे. आज बांग्लादेशमध्ये हिंदूवर अत्याचार होतात, पूर्वी पाकिस्तान, अफगानीस्तान या ठिकाणीही हिंदूंची संख्या कमी झाली. तरी या सर्व घटनेचा विचार करता भारत सरकारने यावर तात्काळ निर्णय घेऊन बांगलादेशातील हिंदू व मंदिरे सुरक्षित करावी, असे ते यावेळी म्हणाले. याचबरोबर दिगंबर गेंट्याल, बापू ठाणगे यांनीही मनोगत व्यक्त केले. या आंदोलनाद्वारे एक ठाम संदेश दिला गेला की, हिंदू धर्मावर होणाऱ्या आघातांचा विरोध करणे हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे.

पुणतांबा येथील हनुमान मंदिर व महादेव मंदिरातील घटनांची सक्षम व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि दोर्षीना कठोर शिक्षा करण्यात यावी, आरोपी खरच मनोरूग्ण आहे का, याची तपासणी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावी, जिल्ह्यातील सर्व मंदिरातील दानपेट्या चोरीच्या घटनांची सखोल चौकशी करून दोर्षींना अटक करण्यात यावी, जिल्ह्यातील सर्व मंदिरांना योग्य ती सुरक्षा पुरवण्यात यावी, जेणेकरून भवीष्यात अशा घटना होणार नाहीत, आदी मागण्या करण्यात आल्या.

# एचएमपीव्ही व्हायरसच्या धसक्याने भारतीय शेअर बाजार कोसळला

## सेन्सेक्स १२०० अंकांनी तर निफ्टीही ३६० अंकांनी घसरला

मुंबई - भारतातील पहिले एचएमपीव्ही प्रकरण समोर आल्यानंतर भारतीय शेअर बाजारात गोंधळाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सोमवारी (दि.६) सेन्सेक्स १२०० अंकांनी घसरला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३६० अंकांनी कोसळला. बँकिंग, फायनान्स आणि ऊर्जा समभागांमध्ये मोठी पडझड होताना मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्येही विक्रीचा सपाटा पाहायला मिळत आहे. इंडिया विक्स, बाजारातील अस्थिरता मोजणारा निर्देशांक १३.३७ टक्के घसरणीसह व्यवहार करत आहे.

एचएमपीव्ही चिनी विषाणूची भारतात एन्ट्री झाली असून याचा पहिला रुग्ण बंगळुरू येथे आढळला आहे. त्यामुळे शेअर बाजारात खळबळ उडाली. बीएसई सेन्सेक्स १,१०० हून अधिक अंकांनी कोसळला तर निफ्टीमध्ये सुमारे १.४ टक्के घसरण दिसून येत आहे. सेन्सेक्सने याआधी सोमवारी सकाळी हिरवीगार ओपनिंग केली पण भारतात एचएमपीव्ही चे पहिले प्रकरण समोर येताच गुंतवणूकदार चक्रावले.

पीएसयु बँकिंग, रिअल इस्टेट आणि तेल व वायू क्षेत्रात सर्वाधिक पडझड झाली असून बँक ऑफ बडोदा, पीएनबी आणि कॅनरा बँक प्रत्येकी सुमारे ४ टक्के आपटले तर एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि कोटक महिंद्रा बँक या सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध कंपन्यांना सर्वाधिक नुकसान झाले. त्याचवेळी, आठवड्याच्या पहिल्या दिवशी, सोमवारी, गुंतवणूकदारांचे लक्ष तिसऱ्या तिमाहीचे निकाल, अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ आणि भू-राजकीय समस्यांवर लागून असताना भारतात एचएमपीव्ही चे पहिले प्रकरण आढळल्याची बातमी आली तेव्हा त्यांना धक्काच बसला. कर्नाटकातील बंगळुरु येथे पहिला एचएमपीव्ही रुग्ण असल्याची बातमी सकाळी समोर येताच शेअर बाजारात मोठी घसरण झाली. हा विषाणू सर्वप्रथम चीनमध्ये आढळून आला असून एचएमपीव्ही प्रकरणाने बाजारातील गुंतवणूकदारांना पाच वर्षांपूर्वी चीनमधून आलेल्या करोनाची आठवण झाली त्यानंतर, गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता आणि भीतीचे वातावरण पसरले.



## मूर्तीची फुलांची सजावट

नगरमधील सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे दाक्षिणात्य पद्धतीचे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहेत. सध्या चालू असलेल्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सवामध्ये मूर्तीची आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात येते. मंदिराच्या मूर्तीच्या गाभाऱ्यात लाईट नाही त्यामुळे तेलाच्या दिव्याच्या प्रकाशात मूर्ती प्रसन्न दिसतात.

# कंपनीतून १५ लाख ५५ हजारांच्या रोकड चोरी

### स्टेशन रस्त्यावरील घटना, चोरी करताना चोरटा सीसीटीव्हीत कैद

नगर - एमआयडीसी येथील क्लासिक व्हील लिमिटेड कंपनीच्या स्टेशन रस्त्यावरील कार्यालयातून चोरट्याने कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ठेवलेली १५ लाख ५५ हजारांची रोकड चोरून नेली. शनिवारी (दि.४) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ही घटना समोर आली. चोरट्याने ऑफिसच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या खिडकीतून आत प्रवेश केल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे.

या प्रकरणी सुनिल शांतीलाल मुनोत (वय ६०, रा. हिरकेश बंगलो, प्लॉट नं. ४२ (अ), स्टेशनरोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील मुनोत हे क्लासिक व्हील लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. कंपनीचे ऑफीस त्यांच्या हिरकेश बंगल्यातच आहे. तेथूनही ते कंपनीचे व्यवस्थापकीय कामकाज, कर्मचार्यांचे पगार करतात. शुक्रवारी (दि.३) त्यांनी नेहमीप्रमाणे सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ऑफीस बंद केले. शनिवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ऑफीसच्या सफाई कामगाराला साफसफाई करताना ऑफीसमधील ड्रॉव्हर तोडल्याचे दिसले.


तिने ऑफीसमधील कर्मचार्याला याची माहिती देताच कर्मचार्याने मुनोत यांना फोन करून माहिती दिली. मुनोत यांनी पाहणी केली असता ऑफीसमधील टेबलचे ३ ड्रॉव्हर तोडल्याचे व त्यात कर्मचार्यांचे पगार करण्यासाठी ठेवलेली १५ लाख ५५ हजारांची रक्कम चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. अज्ञात चोरट्याने ऑफीसच्या पहिल्या मजल्यावरील खिडकीतून आत प्रवेश करून चोरी केल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले.

त्यांनी कोतवाली पोलिसांना घटनेची माहिती देताच पथक घटनास्थळी दाखल झाले. चोरट्याने ऑफिसमध्ये प्रवेश केल्याचे सीसीटीव्हीत दिसून आल्याने पोलिसांनी फुटेज ताब्यात घेतले आहे. चोरट्याची ओळख पटवून त्याचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## गोमातेचे महत्त्व ओळखू या, वाढवू या

गोमाता... अर्थात गाईला आपल्या हिंदू संस्कृतीत देवत्वाचे स्थान आहे. अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या जैन धर्मियांच्या तर अनेक गोशाळा आहेत.

आज या विषयाचे कारण म्हणजे बुधवार ८ जानेवारी २०२५ रोजी निसर्गसृष्टी गोपालन संस्थेच्या श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज गोशाळेत श्री भगवान महावीर जीवदया निवारा शेड (यासाठी वर्धमान संस्कारधाम संस्था, मुंबई यांनी १५ लाख दिलेत) तर सुनंदा जोशी परिवारातर्फे सभागृह लोकार्पण व गोठा भूमिपूजन सोहळा दुपारी ४ वाजता संतमहंतांच्या व दानशूरांच्या सान्निध्यात संपन्न होत आहे.

एक अत्यंत महत्त्वाची व आनंदाची गोष्ट घडत आहे ती म्हणजे आपल्या संस्कृतीची व तत्त्व, देवत्वाची पुन्हा महत्त्व, प्रतिपादन लोकांमध्ये होत आहे.

राज्य सरकारने गोमातेला राज्यमातेचा सन्मान दिला असून, काही गोशाळांसाठी

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



भरीव अनुदानही देत आहे. नगरमध्ये पांजरापोळ सारखी गोरक्षण संस्था शतकापासून कार्यान्वित आहे.

गोमातेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देवत्व तर आहेच. तिच्या दुधाला अमृतासम आरोग्यदायी वरदान आहे. इतकेच काय गायीच्या शेणातून कोट्यावधीचे आर्थिक उत्पन्न मिळते व पर्यावरणास मदत मिळते.

तात्पर्य, गाईला देवासमान मानून यथाशक्ती चारा, सेवा, दान करून आत्मिक आनंद व समाधान मिळवता येते. तुम्हीपण अनुभव घ्याच!

गोशाळा आणि अन्य मार्गाने गोसेवा करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते व दानशूर महानुभाव या सर्वांनाच धन्यवाद, शुभेच्छा!

# रेशन दुकानदारांकडून गरीबांच्या स्वस्त धान्याचा काळाबाजार

### दुकानदारांनी प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण बंद करावे, लवकरच भांडाफोड करणार : शिवसेना युवासेनेचा इशारा

नगर – राज्य शासनाच्या अन्न धान्य वितरण मंत्रालयाने अनेक लोक कल्याणकारी योजना गोरगरिबांसाठी सुरु केल्या आहेत. त्याचा गैरफायदा अहिल्यानगरमधील स्वस्त धान्य दुकानदार घेत आहेत. गोरगरिबांच्या पोटाला चिमटा काढून ते धान्याचा काळाबाजार करीत आहेत. गोरगरिब कुटुंबाच्या तोंडचा घास हिरावून घेत आपली खळगी भरत आहेत. अहिल्यानगरचे पुरवठा अधिकारी याकडे सोईस्करपणे कानाडोळा करीत आहेत. यामागे त्यांचे काहीतरी गुळपिठ असावे. आपल्या भागात एखाद्या कुटुंबातील मृत व्यक्तीच्या नावाने देखील आलेले धान्य ते त्या कुटुंबाला न देता परस्पर त्याचा काळाबाजार करत आहेत.

स्वस्त धान्य दुकानदारांनी हे प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे प्रकार बंद करावेत. या दुकानदारांचे घोटाळे शिवसेनेला पुराव्यानिशी मिळाले असून, पुरवठा खात्याने याकडे लक्ष दिले नाही तर शिवसेना उबाठा गट लवकरच याचा भांडाफोड करणार आहे, असा इशारा युवासेनेचे उपशहरप्रमुख मृणाल भिंगारदिवे यांनी दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगरमधील स्वस्त धान्य दुकानदार दिवसा ढवळ्या लाखो रुपयांच्या धान्याचा काळाबाजार करत आहेत.



मृणाल भिंगारदिवे

राज्य शासनाने दिलेल्या मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाला आहे. गरिबांना रेशनवर मिळणारी साखर गायब झाली आहे. नऊ महिन्यात त्याचा पुरवठा झाला नाही. राज्य शासनाच्या अंत्योदय योजनेत नगर जिल्ह्यात ९० हजाराच्या आसपास लाभार्थी आहेत. त्यांना ही साखर मोफत मिळते आणि अन्नधान्य एक दोन रुपये किलो दराने मिळते. पण एप्रिल महिन्यापासून ती साखर मिळणे दुरापास्त झाले आहे. शासन महिन्याला दोनदा ही साखर प्रतिव्यक्ती एक किलोप्रमाणे लाभार्थीना पाठवते पण ती त्यांच्यापर्यंत पोहोचली नाही बाजारात साखरेचा दर ४५ रुपये किलो आहे.

पिवळ्या आणि केशरी रेशन कार्डावरील जी कुटुंब आहेत, त्यातील अनेक जण कोरोना आणि नंतरच्या काळात मृत झाले त्यांची नोंद असली तरी रेशन कार्डवरून ती नावे काही कारणास्तव काढण्यात आली नाही. त्या मृत व्यक्तीच्या नावाने येणारे धान्य दुकानदार गडप करतात कारण त्यांना त्या घरातील ती व्यक्ती मृत झाल्याचे पक्के ठाऊक असते. स्वस्त धान्य दुकानदार रेशन कार्डधारकाला दम देतात आणि ते धान्य हडपतात.

जे रेशन कार्डधारक धान्य नेत नाहीत, त्यांना दुकानात बोलवून त्यांचे थम्ब इम्प्रेशन घेतले जाते. जे कार्डधारक त्यासाठी देखील येत नाही, त्यावर खोटे थम्ब इम्प्रेस नोंदवण्याचा उपाय त्यांनी शोधला आहे. केशरी रेशन कार्डधारकांना मिळणाऱ्या अनेक योजनांमधील धान्य आणि साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत, ते दुकानदार हडप करतात. अंत्योदय योजनेतल्या कार्डधारकांना तासंतास रांगेत उभे ठेवतात पण धान्य देत नाही. कुपनवर काही शिल्लक नाही, असे धडधडीत खोटे सांगतात. आणि धान्याचा काळाबाजार करुन आपले उखळ पांढरे करून घेतात. ही पॉस मशीनच्या रेशन धारकाच्या कन्फर्मेशनसाठी जो एसएमएस येतो, तो त्या धारकाच्या अधिकृत मोबाईलवर जातो पण अनेक रेशन कार्डधारकांच्या नोंदणीवर स्वस्त धान्य दुकानदारांनी आपल्याच जवळच्या व्यक्तींचे मोबाईल टाकलेले आहेत त्यामुळे त्यांना एसएमएस जातच नाही, यांनाच येतो आणि ते तो टाकून मोकळे होतात. याद्वारे देखील मोठा धान्याचा काळाबाजार केला जात आहे.

शिवसेना ठाकरे गटाकडे याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, लवकरच परिसर पुरावे घेऊन जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहोत. स्वस्त धान्य दुकानदारांवर धान्याचा काळाबाजार केल्याचे रितसर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार आहोत. पुरवठा खात्याने याची दखल घेतली नाही तर शिवसेना स्टाईल आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त नामदेव धामणे यांचे निधन

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील रहिवासी राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले प्राथमिक शिक्षक नामदेव सखाराम धामणे (वय ५१) यांचे रविवारी (५ जानेवारी) दुपारी अल्पशा आजाराने आकस्मित निधन झाले.



रात्री उशिरा सारोळा कासार येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, ४ बहिणी, पुतणे असा परिवार आहे. कै. धामणे हे सध्या श्रीगोंदा तालुक्यातील चिखली येथील गाडेकर वस्ती जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते. त्यांना तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## अर्चना मुळे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गुंजन स्टेट बँक कॉलनी, भुतकरवाडी येथील रहिवासी अर्चना अशोक मुळे (वय ७४) यांचे २ जानेवारीला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पती, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्टेट बँकेतील अधिकारी अशोक मुळे यांच्या त्या पत्नी तर बी.एड्. कॉलेजचे निवृत्त प्राचार्य अच्युत गंधे हे त्यांचे भाऊ होत.



# एचएमपीव्ही विषाणू चिंतेचे कारण नाही, नगरकरांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी

### श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी महानगरपालिकेच्या सूचनांची अंमलबजावणी करावी : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे आवाहन

नगर – चीनमध्ये मानवी मेटान्यूमो व्हायरसचा (एचएम पीव्ही) उद्रेक झाल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या आरोग्य विभागाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत एचएमपीव्हीचा एकही रुग्ण आढळलेला नाही. चीनमधून आलेल्या या नवीन विषाणुमुळे चिंतेचे कारण नसले तरी, नागरिकांनी आवश्यक दक्षता घ्यावी. या प्रकरणी भितीचे वातावरण निर्माण करू नये, महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

एचएमपीव्ही हा एक हंगामी रोग आहे. जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवतो. या अनुषंगाने केंद्राच्या आरोग्य विभागाने ३ जानेवारी रोजी निवेदन प्रसिध्द केले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील श्वसनाच्या संसर्गाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले आहे. वर्ष २०२३ च्या तुलनेत डिसेंबर २०२४ मध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.



एचएमपीव्ही विषाणू संदर्भात बैठकीत मार्गदर्शन करताना आयुक्त यशवंत डांगे.

मात्र, खबरदारीचा भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

**नागरिकांनी हे करावे :**

१) जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.

२) साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवावेत.

३) ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे.

४) भरपूर पाणी प्यावे आणि पौष्टिक अन्न खावे.

५) संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्यावी.

**नागरिकांनी हे करू नये :**

१) हस्तांदोलन करू नये.

२) टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करू नये.

३) आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळावा.

४) डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे टाळावे.

५) सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.

६) डॉक्टरांच्या सल्लयाशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेऊ नये.

## रवींद्र नागपुरे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – भिंगार मधील रहिवासी रविंद्र रमेश नागपुरे (वय ४९, सैनिक नगर, रा.भिंगार) यांचे ४ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. मयत नागपुरे हे गेली अनेक वर्ष नगर शहरातील एका फर्निचरच्या दुकानात काम करत होते.



## राहुल दारुणकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – येथील रहिवासी राहुल अर्जुन दारुणकर (वय ३५, रा.तेलीखुंट) यांचे ५ जानेवारी रोजी पुणे येथे हृदयविकाराने निधन झाले.



त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, ९ बहिणी, मेहुणे, नातवंडे असा परिवार आहे.

# शस्त्राचा धाक दाखवून २ घरांवर दरोडा; सोन्याचे दागिने, रोकडसह ऐवज लंपास

नगर – इसळक (ता. नगर) शिवारातील खारेकर्जुने रस्त्यावरील खपके वस्तीवर सात जणांच्या टोळक्याने शनिवारी (दि.४) पहाटे चांगलाच धुमाकूळ घातला. शस्त्राचा धाक दाखवून दोन घरावर दरोडा टाकून सोन्याचे दागिने, रोकड असा ९१ हजाराचा ऐवज लांबविला. चोरट्यांच्या दहशतीमुळे इसळक शिवारात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी अनिल सुधाकर खपके (वय ४५, रा. खपके वस्ती, खारेकर्जुने रस्ता, इसळक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सात अनोळखी दरोडेखोरांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दरोडेखोरांची ओळख पटलेली नसून त्यांचा शोध एमआयडीसी पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून घेतला जात आहे. शुक्रवारी रात्री अनिल खपके हे कुटुंबासह घरात झोपी गेले होते. शनिवारी पहाटे सव्वा एक ते सव्वा दोनच्या सुमारास सहा ते सात चोरट्यांनी अनिल यांच्या घरात प्रवेश केला. चोरट्यांच्या हातात कुर्हाड, लाकडी दांडके, कटर होते. त्यांनी शस्त्राचा धाक दाखवून घरातील १८ हजार ५०० रूपयांची रोकड, १.५ ग्रॅमचे सोन्याचे जोडवे, चार ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण, १५ ग्रॅमचे सोन्याचे गंठण, तीन ग्रॅमची सोन्याची अंगठी व एक जाकिट असा ८९ हजाराचा ऐवज चोरला. त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा शेजारी असलेल्या रामकिसन वसंत खपके यांच्या घराकडे वळविला. त्यांच्या घराच्या कंपाऊंडची तार तोडून व घराची कडी तोडून आत प्रवेश केला. त्यांना शस्त्राचा धाक दाखवून घरातील सामानाची उचकापाचक केली. रामकिसन यांच्या घरात चोरट्यांना दोन हजाराची रोकड मिळून आली. दोन्ही घरातून चोरट्यांनी ९१ हजाराचा ऐवज चोरल्यानंतर ते पसार झाले.

सदर घटनेची माहिती एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळल्यानंतर पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक (नगर ग्रामीण) संपत भोसले, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, उपनिरीक्षक मोंढे, उपनिरीक्षक विनोद परदेशी, जाधव यांनी पोलीस अंमलदारांसह घटनास्थळी भेट दिली.

पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

## दुचाकी सावकाश चालव म्हणाल्याने युवकाला चौघांनी केली बेदम मारहाण

नगर – दुचाकी सावकाश चालव नाही तर अपघात झाला असता असे समजावून सांगत असलेल्या तरूणाला चौघांनी मारहाण केली. शनिवारी (दि.४) सायंकाळी पावणे सातच्या सुमारास बालिकाश्रम रस्त्यावर ही घटना घडली. विनय दिलीप आहुजा (वय २६, रा. बालिकाश्रम रस्ता) असे मारहाण झालेल्या तरूणाचे नाव आहे.

त्यांनी रात्री उशिरा दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयुर चावरे, राहुल झेंडे (पूर्ण नावे नाहीत, दोघे रा. सिध्दार्थनगर) व दोन अनोळखी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. विनय त्यांच्या दुचाकीवरून बालिकाश्रम रस्त्याने घरी जात असताना उत्तम टायर्सच्या दुकानासमोर समोरून दुचाकीस्वार जोरात आल्याने विनय यांनी त्यांची दुचाकी थांबवली व त्याला समजावून सांगत असताना त्याने त्याच्या इतर मित्रांच्या मदतीने विनयला मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## भगवान सुडके यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – शहराच्या सुडके मळ्यातील भगवान गंगाधर सुडके (वय ७६) यांचे ४ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. धार्मिक, कष्टाळू व मनमिळाऊ स्वभाव असल्याने ते सर्वांना परिचित होते. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, बहीण, चार मुले, सुना, नातवंडे, भाऊ, पुतणे असा परिवार आहे.



## सौ.सविता बेद्रे यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील सौ.सविता दत्तात्रय बेद्रे (वय ७५) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय गणपतराव बेद्रे यांच्या पत्नी, किरण बेद्रे व अकांऊंटंट कैलास बेद्रे यांच्या मातोश्री, चि.युवराज बेद्रे यांच्या आजी होत.



## राजेंद्र (बाळासाहेब) शिंदे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील राजेंद्र (बाळासाहेब) विठ्ठल शिंदे (वय ५८) यांचे ६ जानेवारी रोजी दुपारी १ वा. हृदयविकाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शहरातील सुभाष कॉलनी येथील साईबाबा मंदिर ट्रस्टचें अध्यक्ष विजय शिंदे व संजय शिंदे यांचे थोरले बंधू, आमआदमी पार्टीचें जिल्हाध्यक्ष तिलक डुंगरवाल यांचे मामा, मार्केटयार्ड शेजारील बजरंग टो वर्क्स शॉपचे मालक मनोज शिंदे व प्रभात दूध डेअरी ऑपरेटर अक्षय शिंदे यांचे वडील होत.

# 'डिजे बंदी'चा ठराव करत डिजे लावणाऱ्यांच्या लग्नात उपस्थित न राहण्याचा समाजाचा निर्णय

नगर – शहरात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्यानिमित्त जिल्ह्यासह राज्यातील बांधव एकत्र आले होते. या वधू-वर मेळाव्यात लग्नात डिजे बंदीचा ठराव घेण्यात आला. तर डिजे लावणाऱ्या समाज बांधवांच्या लग्नात संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार नसल्याचा इशारा देण्यात आला. यावेळी समाजबांधव व महिला वर्ग उपस्थित होत्या.





टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने चर्मकार समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांना अभिवादन करुन दीपप्रज्वलनाने झाले.

शहराच्या टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने चर्मकार समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांना अभिवादन करुन दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपतराव बारस्कर, चर्मकार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी साळवे, अजित रोकडे, आर्किटेक्चर कल्याणराव सोनवणे, विश्वनाथ निर्वाण, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब लोहकरे, प्रकाश पोटे, बाळासाहेब केदारे, जिल्हा संघटक दिलीप शेंडे, वधू-वर मंडळ अध्यक्ष आश्रू लोकरे, वधू-वर केंद्रप्रमुख बापूसाहेब देवरे, शशीकलाताई झरेकर, उद्योजक बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठलराव जयकर, रामकिसन साळवे, आप्पासाहेब केदारे, मनीषा जाधव आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात शिवाजी साळवे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज शाहू फुले, आंबेडकर यांची विचारधारा घेऊन संघटनेच्या माध्यमातून कार्य सुरु आहे. समाज नोकरी, व्यवसाय व उद्योगधंद्यामुळे विखुरला गेल्याने मुला-मुलींचे लग्न जमविताना मोठा प्रश्न उभा राहत आहे. दरवर्षी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करुन समाजातील मुला-मुलींचे लग्न जमविण्याचे काम केले जात आहे. तर या कार्यक्रमानिमित्त राज्यातील चर्मकार समाज बांधव एकत्र येत आहे. समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात सातत्याने संघटनेच्या माध्यमातून आवाज उठविण्यात आला आहे. तर समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहे. संघटनेने गटई कामगारांना आंदोलनाच्या माध्यमातून पीच परवाने मिळवून दिले असल्याची माहिती त्यांनी दिली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, दरवर्षी होणाऱ्या वधू-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून शहरात चर्मकार समाजबांधव एकत्र येत आहे. या कार्यक्रमातून अनेकांच्या लग्नाच्या रेशीमगाठी जुळल्या आहेत. हा मेळावा फक्त लग्न जमविण्यापुरता मर्यादीत न राहता, सर्व समाज एकत्र आल्याने भविष्याची दिशा ठरवून वाटचाल करत आहे. समाजासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून ५० लाख रुपये निधी उपलब्ध करुन सावेडीत संत रविदास महाराज विकास केंद्राचे काम सुरु आहे. तसेच केडगावमध्ये देखील समाजाला जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासाठी सुद्धा ५० लाख रुपयांचा निधी दिला आहे समाजात विविध संघटना कार्यरत असून, समाजहित हे एकमेव ध्येय समोर ठेऊन कार्य करत आहे. चर्मकार संघर्ष समितीच्या माध्यमातून समाजाला व नवीन पिढीला दिशा देणारे कार्य सुरु आहे. सदर लोकहित चळवळीचे कार्य सर्वांना पुढे घेऊन जावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या मेळाव्यात विवाह समारंभाप्रसंगी समाजात रुजू पाहत असलेले चुकीचे पायंडे मोडीत काढण्याचे आवाहन करण्यात आले. महिलांनी अंधश्रद्धा झुगारून पुढे यावे. डीजे मुक्तीच्या ठरावाबरोबरच डोळ्यांना घातक ठरत असलेल्या लेजर लाईटला देखील प्रतिबंध करण्याचे स्पष्ट करण्यात आले. उपस्थित सर्व समाज बांधव व महिलांनी या ठरावाला हात उंचावून एकमुखाने सहमती दर्शवली.

सूत्रसंचालन सचिन नन्नवरे व सुनील धस यांनी केले. आभार बाळकृष्ण जगताप यांनी मानले.

# गृहिणी

## आरोग्य

### थकवा दूर करण्यासाठी

आजकालच्या व्यस्त जीवनशैलीत आपण अनेकदा आपल्या आरोग्याची काळजी घेणे विसरतो. दही या गोष्टींचे सेवन करून तुम्ही तुमचा थकवा कमी करू शकता. दह्यात प्रोटीन आणि कार्बोहायड्रेट्स असतात, क्रीमलेस दही खाल्ल्याने तुमचा थकवा आणि सुस्ती दूर होईल. हे तुमचे शरीर थंड ठेवण्यास देखील मदत करते ज्यामुळे थकवा कमी होतो.

## पाककला

### बनारसी गोटे

**साहित्य :** चण्याची डाळ चार वाट्या, दही एक वाटी, सोडा, मीठ, आले, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, हिंग, धने, साखर, तेल.

**कृती :** चण्याची डाळ साधारण जाडसर दळून घ्यावी. त्यात दही घालावे व पाच-सहा चमचे कडकडीत तेलाचे मोहन घालावे. तसेच चवीप्रमाणे मीठ व ओल्या मिरच्या वाटून, धने व हिंग यांची पूड करून, आले वाटून, कोथिंबीर चिरून व चवीप्रमाणे साखर घालून, पीठ दोन तास भिजवून ठेवावे. पीठ भज्याच्या पिठाप्रमाणेच भिजवावे. तळण्याच्या वेळी अर्धा चमचा सोडा घेऊन, भजी गोल करून तळावी.

## वास्तू

### बेडरुम संबंधी

बेडरुममध्ये कोणत्याही देवाची किंवा देवीची चित्रे किंवा मूर्ती असू नये. यासोबतच तुमच्या मृत नातेवाईकांचे फोटोही बेडरूममध्ये ठेवू नयेत. जर असे असेल तर त्यामुळे गंभीर वास्तुदोष निर्माण होतो आणि पती-पत्नीमध्ये नेहमी भांडणे होतात. बेडरुममध्ये देवदेवतांची चित्रे लावल्याने संततीच्या वाढीमध्ये अडथळे निर्माण होतात.

## सल्ला

रोज दोन वेळा दात स्वच्छ घासावे. जेवणानंतर बडिशोप खावी, याने पाचनही चांगले होते व तोंडाला दुर्गंधीही येत नाही.

## सौंदर्य

देसी तूप सतत ओठांवर लावल्यास तडक्यांची तसेच भेगा पडण्याची समस्या दूर होते. याने काळेपणा नाहीसा होऊन ओठ मऊ व गुलाबी होतात.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ७ जानेवारी २०२५

**दुर्गाष्टमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, रेवती १७/५०, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ५० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** अचानक जुने मित्र भेटतील. कुटुंबातील सदस्यांबरोबर आनंदाचे क्षण अनुभवाल.

**वृषभ :** स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाल. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल.

**मिथुन :** जोडीदाराला समजावून घ्याल. तुमचे व्यक्तिमत्त्व आज बहरेल. चिकाटीने कार्यरत राहाल.

**कर्क :** मानसिक ताण शक्य. कठोर बोलणे वा सहकाऱ्यांशी गैरवर्तणूक महागात पडेल. मैदानी खेळात सहभागी व्हाल.

**सिंह :** आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. नात्यामध्ये कटुता निर्माण होईल.

**कन्या :** आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल. स्थावर मालमत्तेत गुंतवणूक कराल.

**तूळ :** वाहने व उपकरणे जपून वापरावीत. जोडीदाराबरोबर रोमँटिक क्षण अनुभवाल.

**वृश्चिक :** सहकाऱ्यांशी आपुलकीने वागाल. अति खाणे टाळाल. मागील उधारी वसुल होईल.

**धनु :** शारीरिक व्यायामाचे महत्त्व लक्षात घ्याल. काही प्रमाणात प्रवास करावा लागेल.

**मकर :** आरोग्य उत्तम राहील. आर्थिक स्थितीमध्ये बदल घडतील.

**कुंभ :** अनावश्यक गोष्टींचा विचार केल्याने मनस्ताप संभवतो. मानसिक बळ वाढेल. नोकरीत अनुकूल स्थिती राहील.

**मीन :** कर्जाऊ रक्कम दिल्याने फसवणूक होईल. व्यवसायात भागीदारी तूर्तास नको. वैवाहिक चांगले बहरेल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### पंख नाहीत

पाकिस्तानी सैनिक भीतीने गर्भगळित होऊन शस्त्रास्त्रे टाकून पळत सुटले. मागच्या चौकीवरच्या कॅप्टनने चौघांना अडवून रागाने विचारले, तुम्ही पळून का चालला आहात?'' तेव्हा ते भेदरलेले सैनिक म्हणाले, ''आम्हाला पंख नसल्याने उडता येत नाही म्हणून !''

# जागतिक आश्चर्ये

### हँगसु ब्रीज

हँगसु समुद्रकिनारी ब्रीज हा पूर्णत: केबलचा उपयोग करुन बांधलेला आहे. दोन महासागरांना जोडलेला हा जगातील सर्वात लांबी असलेला सागरी पूल आहे. चीनच्या पूर्व समुद्र किनाऱ्यालगत हा पूल असून तो १७ जून २००७ ला बांधून पूर्ण झाला. झियाझिंग म्युनसिपालिटी आणि नींगबो म्युनिसिपालीटी यांना जोडणारा हा पूल आहे.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०८७ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ |
| ६ | | ■ | ७ | | | ■ | |
| | ■ | ८ | | ■ | ९ | १० | |
| ■ | ११ | | | ■ | १२ | | |
| १३ | | ■ | ■ | १४ | ■ | | ■ |
| १५ | | ■ | १६ | | ■ | १७ | १८ |
| | ■ | १९ | | ■ | २० | | |
| २१ | | | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द :-** १) राजस्थानातील एक पर्वत ४) अध्यापक; पुराणिक ६) लोकनाट्य तमाशातील एक भाग ७) एक प्रकारचे गीत; रोप वगैरे लावणे ८) जखम; वार; आघात ९) राक्षस; दैत्य; असुर ११) मातीची दिवली ज्यात दिवाळीत हमखास दिवा लावला जातो १२) रुपे; चांदी १३) शत्रूच्या गोटातील माहिती गुप्तपणे आणणारा १५) पोपट; राघू; कीर १६) शिक्षा; शासन १७) वाकलेला; झुकलेला १९) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी २०) आश्चर्य; नवलाचे २१) रीतीला धरून; पद्धतशीर २२) मलशुद्धी करणारे औषध

**उभे शब्द :-** १) दशा; गत; हाल २) मस्ती; जोर ३) भास्कराचार्यांचा गणितावरील एक ग्रंथ ४) सतेज; तेजस्वी ५) लाकूड कापण्याचे हत्यार ८) गलिच्छ; अस्वच्छ १०) दृष्टादृष्ट ११) कालच्या आदला किंवा उद्याच्या नंतरचा दिवस १३) इकडचे तिकडे व तिकडचे इकडे असे काही तरी घोटाळे करणे १४) परवानगीने काढलेली सुट्टी १६) युद्ध; रण; लढाई १८) लहान नक्षीदार ताट १९) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा; कवळ २०) अशा प्रकारचा; असला

### शब्दगंध क्र. ७०८६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | वि | र | त | ■ | क | स | ■ |
| म | ना | ■ | सा | ब | र | म | ती |
| र | म | त | ■ | स | म | र | स |
| ना | क | ■ | डा | ■ | णू | ■ | ■ |
| थ | ■ | ट | क | ट | क | ■ | हे |
| ■ | बी | ■ | घ | र | ■ | ख | वा |
| घा | ■ | त | र | फ | दा | री | ■ |
| स | म | स्त | ■ | ल | ट | प | ट |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपल्यासाठी कुणीही नसले तरी आपण सर्वांसाठी आहोत ही गोष्ट फुलांकडून शिकावी.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## आईस्क्रीमचा शोध कोणी लावला?

रणरणत्या उन्हात घामाच्या धारांवरील एकमेव जालीम उपाय म्हणजे कोनाच्या सर्वबाजूंनी ओळघणारे आईस्क्रीम. तापमानाचा पारा चढलेला असताना आपल्याला हा थंडगार खाद्यपदार्थ चाखावासा वाटतोच, पण कुडकुडणाऱ्या थंडीतही या पदार्थाचा आनंद ज्यांनी लुटला असेल ते खरे आईस्क्रीमचे चाहते. निमित्त काहीही असो, शेवट गोड करायचा असेल तर आईस्क्रीमलाच पसंती दर्शवली जाते.

आईस्क्रीमच्या इतिहासात डोकावायला गेल्यास तब्बल २५०० वर्षे मागे जावे लागते. आता आपण खात असलेल्या आईस्क्रीमपेक्षा कितीतरी वेगळे आईस्क्रीम पहिल्यांदा प्राचिन पर्शियामध्ये बनवले गेले. गोड चवीच्या पाण्याच्या बर्फाचे तुकडे करून त्यावर वेगवेगळ्या चवीचे पदार्थ आणि फळांनी ते सजवलं जात असे. आईस्क्रीम बनवण्याची ही पद्धत हळूहळू रोमन आणि ग्रीक साम्राज्यातही पोहोचली. खरंतर आईस्क्रीम बनवण्याची प्रक्रिया फारच खर्चिक होती. परंतु तिथल्या राजांनी अतिशय खुल्या मनाने या पदार्थाचे स्वागत केले आणि त्यांच्याकडे असलेल्या मुबलक संपत्तीच्या जोरावर त्याला मानाचं स्थान प्राप्त करून दिलं. पुढे रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर शिखरांवरून शहरात येणाऱ्या बर्फाची वाहतूक बंद झाली आणि मग आईस्क्रीम बनवणं आणि खाणं ही खर्चिक बाब बनली.

इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिला आपल्या आईस्क्रीम पाककृतीला उर्वरित इंग्लंडपासून गुप्त ठेवण्यासाठी खानसाम्याला प्रतिवर्षी ५०० पौंड देत होता, असे सांगितले जाते. मार्को पोलो (१२५४-१३२४) या प्रवाशाने आपल्या चीनच्या दौऱ्यात आईस्क्रीम तयार करून इटलीला आणल्याचे पुरावे सापडतात. परंतु, पर्शियाप्रमाणेच चीनमध्येही इसवी सन पूर्व २०० च्या आसपास दूध आणि भाताचे गोठवलेले मिश्रण याच काळात जन्माला आले होते. त्यामुळे आशिया खंडासाठी आईस्क्रीमचा समावेश कधीच आयात केलेल्या पदार्थांच्या यादीत नव्हता.

१३ व्या आणि १४ व्या शतकात, इटली हे मध्य पूर्वेकडील देश आणि आशियासाठी व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे तेथे येणाऱ्या व्यापाऱ्यांमार्फत आईस्क्रीम युरोपातील वेगवेगळ्या देशात पोहोचण्यास मदत झाली. असं असलं तरी, आईस्क्रीमचा विस्तार फार सोपा नव्हता. १५३३ मध्ये इटलीची कैथरीन डीमेडीसी ही फ्रान्सच्या ड्यूक डी ऑर्लीन्स (फ्रान्सचा भावी राजा) याच्याशी विवाह करण्यासाठी फ्रान्सला गेली. तिथे तिने पूर्वेकडील आश्चर्यकारक गोष्टींसोबत युरोप खंडातील खानदानी गोष्टींची ओळख करून दिली. त्यामध्ये जेवणाची वेगळी भांडी, उंच टाचांचे बूट आणि अर्थातच आईस्क्रीम यांचा समावेश होता. पुढे नवीन कल्पना, तंत्रज्ञान आणि प्रयोगांच्या माध्यमातून आईस्क्रीमला लोकप्रियता प्राप्त झाली. उत्तर अमेरिकेत मात्र आईस्क्रीमच्या विक्रीला औद्योगिक क्रांतीनंतर आणि इंग्लंड व फ्रान्सच्या मागोमाग सुरूवात झाली. पण सगळीकडे आईस्क्रीमला दीर्घकाळासाठी गोठवून ठेवणे ही समस्या कायम होती. या समस्येचे निराकरण होण्यासाठी विसावे शतक उजाडावे लागले. १९२६ साली इलेक्ट्रीक फ्रिझरचा शोध लागला आणि हव्या त्या क्षणी गारेगार आईस्क्रीम ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली.

## म्हातारा आणि तरुण

एक अविचारी तरुण माणूस रस्त्याने चालला असता म्हातारपणामुळे ज्याचे शरीर धनुष्यासारखे वाकले आहे असा एक माणुस त्याला दिसला, तेव्हा तो त्या म्हाताऱ्याला म्हणाला, 'बाबा तुमचं हे धनुष्य मला विकत देता का ?' म्हातारा त्यावर म्हणाला,

'तुम्ही पैसे खर्च करून धनुष्य विकत घेण्यापेक्षा थोडे थांबाल तर बिनपैशाने असंच धनुष्य तुम्हाला मिळेल, कारण तुम्हाला म्हातारपण आलं म्हणजे तुमच्याही शरीराचं असंच धनुष्य होणार आहे.'

हे ऐकताच तो तरुण माणू खाली मान घालून निमूटपणे चालता झाला.

तात्पर्य : माणसाला म्हातारपणामुळे निर्माण झालेल्या वैगुण्याबद्दल त्याची चेष्टा करून त्यात आनंद मानणे हे माणूसकीचे लक्षण नव्हे.

# रहमते दर्शन (भाग - १)



महाराज जी ने अपना दया - मेहर भरा हाथ लड़की के सिर पर रखा और प्रसाद दिया। शाम को महाराज जी से कहने लगी, महाराज जी मेरे सिर पर हाथ रख दो। महाराज जी ने उसके सिर पर हाथ रख दिया और आगे बढ़ गये। वह फिर आगे चली गई और फिर उस दया के महासागर ने उसके सिर पर हाथ रखा। इस प्रकार यह सिलसिला चलता रहा और महाराज जी ने उसी रोज़ उसके कहने पर चार-पाँच बार उसके सिर पर हाथ रखा। रात को हम सो गये क्योंकि कई दिन से चिंता के कारण हम पति

और पत्नी चैन की नींद सो नहीं पाए थे। महाराज जी के आश्वासन् के बाद हम उस रात को सो गये। सुबह ९ बजे हमें लड़की ने उठाया और कहने लगी, उठो, मैं तुम्हारे लिए दूध गर्म करके लाई हूँ। मैं तो आँखें फाड़ कर देखने लगा कि जिस की देखभाल

### दया की भीक

हमें करनी पड़ती थी, वह आज हमारी देखभाल कर रही है। इतना ही नहीं, उसने कहा, मैंने तो स्नान भी कर लिया है और दूध भी पी लिया है। मैंने कुल्ला करके दूध पीया और महाराज जी के दरवाजे पर जाकर उनका धन्यवाद किया। दो-तीन दिन आश्रम में रहकर और महाराज का कोटि-कोटि धन्यवाद करने के बाद महाराज जी का आशीर्वाद और प्रसाद लेकर हम घर आये। महाराज जी ने मुझसे कहा था, चिंता नहीं करो, ये जल्द ही ठीक हो जायेगी और जल्द ही इसकी शादी भी हो जायेगी। यह आश्वासन मेरे लिए बड़ा महत्त्व रखता था घर आकर सभी हैरान थे कि यह चार-पाँच दिन में ही कैसे ठीक हो गई।

कुछ ही दिनों के बाद उसकी शादी भी हो गई, हालाँकि शादी के एक-डेढ़ महीने के बाद उसकी मृत्यु भी हो गई। हमें इसका कोई गम न था क्योंकि महाराज जी न उस पर अपार दया की थी। हम दिल्ली महाराज जी के पास गये और इस घटना का सम ाचार दिया। महाराज जी ने हमें आश्वासन दिया और कहा कि फिक्र नहीं करो, वो महाराज कृपालसिंह जी की गोद में पहुँच गई है। ये थी महाराज दर्शनसिंह जी की दया मेहर, जो उन्होंने मुझ जैसे तुच्छ जीव पर की।

### वे दया सागर थे

मेरा परम सौभाग्य रहा है कि मुझे हुजूर बाबा सावनसिंह जी महाराज, संत कृपालसिंह जी महाराज, दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज एवं वर्तमान युग के महापुरुष संत राजिन्दर सिंह जी महाराज के पवित्र चरणों में बैठने का अवसर प्राप्त हुआ । यहाँ मैं दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की कुछ मेहरबानियों का वर्णन करूँगा, जो उन्होंने मुझ

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

आप के दिमाग में एक सोया हुआ जीनियस है। इस अदृश्य शक्ति के आगे कोई बाधा नहीं है। इस शक्ति को जागृत करने के लिये मन में विश्वास रखो और सदा याद रखो कि मुझे आपने साथियो के प्रति सहानुभूति रखनी है, वह यह कि मैं जो भी कार्य करूंगा उस से मनुष्यों का भला होगा। मैं स्वार्थ से नहीं, सेवा भाव से कार्य करूगां। ये भावनाए दिन में ३-४ बार दोहरायें। आप में जैसा बनने की गहरी भावना और इच्छा होगी, आप वैसे ही बन जाएंगे। पता लगायें कि आप सब से ज्यादा क्या चाहते हैं। बस इतना करते ही इसे हासिल करने की नीव पड़ जाती है। प्रबल गहरी इच्छा बीज है, जिस से हमारी उपलब्धियां प्रस्फुटित होती हैं। ऐसा काम चुने जिस से उन सभी लोगों को फायदा हो, जो आप की गतिविधियों से प्रभावित होते. हैं। मस्तिष्क एक चुंबक है और यह उन लोगों को आप की ओर आकर्षित कर लेगा, जो विचारों और आदर्शों में आप के मस्तिष्क के प्रबल विचारों के सामंजस्य में होते हों। जो विचार मन में रखे जाते हैं वही फ्लेगें फूलेगें। सफल लोग सुपरमैन नहीं होते। परंतु सफलता के

### दिमाग की शक्ती

लिये सुपर मस्तिष्क का होना जरूरी है। हर विपरीत पारिस्थिति में भी अच्छे परिणाम कैसे आयें, यह सोचना है और विश्वास रखना है। विश्वास का अर्थ यह नहीं कि आप जिस चीज की इच्छा करते हैं, मिल ही जाएगी। हर चीज की अति बुरी होती है। विश्वास का अर्थ है सही दिशा में जाना और असंभव कार्य को संभव कर लेना । दिमाग और श्रेष्टता

श्रेष्टता का सोचते हैं तो मस्तिष्क में चुंबक बन जाता है जो श्रेष्ठ चीजों को अपनी ओर खींचता है। जब बुरा या बुरे परिणाम सोचते हैं तो मस्तिष्क में विकर्षण की शक्ति पैदा हो जाती है जो श्रेष्ठता को आप से दूर कर देती है। श्रेष्टता की आश से मन में ऐसी शक्तियां गतिशील हो जाती हैं जो चाही गई इच्छाओं को संभव कर देती हैं। श्रेष्ट बनने के अवसर आते हैं, परंतु मानसिक तनाव या आलस्य के कारण लोग उन क्षणों का लाभ नहीं उठा पाते।

प्रत्येक मनुष्य में प्रेम की भावना है परंतु समय पर प्रदर्शन नहीं कर पाता। वह चुपचाप खड़ा रहता है। वहीं चूक जाता है। चूकने का

कारण है विश्वास की कमी। संसार की समस्त औषधियों से बढ़ कर महा औषध है विश्वास। इस औषधि में जितनी शक्ति है, वह संसार के बड़े से बड़े टानिक में भी नहीं है। आरोग्य की भावना व विश्वास से जितना आरोग्य प्राप्त होता है, वह किसी भी आरोग्यवर्धक औषधि से नहीं होता। रोग हो जाने पर लोग बुरी तरह घबरा जाते हैं। घबराहट के कारण रोग में अत्यधिक वृद्धि हो जाती है। आशा और विश्वास हमें तनाव मुक्त बनाते हैं। आशा हमें असफलता से बचाती है। हमें अच्छा सोचने के लिये बाध्य करती है। यदि आप संसार में कुछ अच्छा करना अथवा बनना चाहते हैं, तो एक क्षण के लिये भी इस विचार को मन में न आने दें कि आप कुछ नहीं कर सकते या कुछ नहीं बन सकते। यदि कभी ऐसा विचार आये तो उसे तुरंत कुचल दें।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

बहुधा मधुमेह असणाऱ्या गर्भवतींमध्ये गर्भोदक अतिप्रमाणात आढळते.

**इ) कमी गर्भोदक** (Oligoydraminous):

गर्भाभोवती गर्भोदक कमी प्रमाणात असणे यालाच कमी गर्भोदक असे म्हणतात. बाळाभोवती गर्भोदक कमी झाल्याने गर्भाशयामध्ये बाळ गुदमरले जाते. अशा वेळी बाळाची वाढ कमी होते व बाळ लहान दिसते; त्यामुळे गर्भाशयाचा आकार देखील लहान दिसतो. सोनोग्राफीमध्ये गर्भोदक कमी आहे हे समजल्यावर डॉक्टरांकडे बाळाचे ठोके व्यवस्थित आहे का, हे पाहण्यासाठी वारंवार तपासणीस जावे; कारण बाळ गुदमरून दगावण्याची शक्यता असते. जर बाळाच्या जीवाला धोका असेल, तर लवकर प्रसूती करून डॉक्टर बाळाला व आईला वाचवितात. कमी गर्भोदक आहे हे समजल्यावर लगेचच सलग दहा दिवस रोज एक ग्लास गहूरोपरस सुरू करावा. तसेच रोज एका नारळाचे पाणी प्यावे. त्याने गर्भोदक वाढण्यास: लेला रक्ताची कमतरता होते.

**१७) रक्ताचे प्रमाण कमी असणे** (naemia):

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

गर्भवतीमध्ये बराच वेळेला रक्ताची आढळून येते. गर्भस्थ बाळाचे भरण, पोषण हे पूर्णपणे मातेवर अवलंबन गर्भनाळेमार्फत मातेच्या रक्तातून गर्भाचे पोषण होते. अशा अवस्थेमध्ये - आहाराची व औषधांची योजना करणे आवश्यक असते. गर्भवती स्त्रीने जर पनि सकस आहार घेतला नाही, तर रक्ताचे प्रमाण कमी होते व याचा दुष्परिणाम मा गर्भस्थ बालक या दोघांच्याही आरोग्यावर होतो.

**आहार योजना :**

याचे संपूर्ण विवेचन आपण गर्भावस्थेतील आहार या प्रकरणात केले आहे. पौष्टिक व रक्तवर्धक आहार घेणे आवश्यक आहे. जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्या भरपूर प्रमाणात सेवन केल्या पाहिजेत. आठवड्यातून दोन दिवस पालकाची भाजी खावी । गाजर, टोमॅटो, बिट, मोड आलेले कडधान्य यांची कोशिंबीर बनवून खावी. काळे मनुके । काळी खजूर, डाळिंब ही फळे दिवसभरातून मधल्या वेळेत खावेत. नाचणी सत्त्व, नाचणी लाडू, गुळशेंगदाणे लाडू यांचा आहारात वापर करावा.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :**

आयुर्वेदामध्येरक्ताचीकमतरताभरूनकाढण्यासाठी अनेक औषधी योग सांगितले आहेत. त्यामध्ये धात्री लोह, ताप्यादी लोह, पुनर्नवादी लोह, मण्डूर लोहासव, च्यवनप्राश यांचे सेवन केल्यास रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढते.

**१८) कॅल्शियमचे प्रमाण कमी असणे :**

गर्भवती स्त्रीचे रक्त, कॅल्शियमचे प्रमाण प्राकृत असणे फार आवश्यक आहे. गर्भस्थ बाळाचे व भावी मातेची हाडे मजबूत राहण्यासाठी कॅल्शियमची गरज असते. तसेच बाळामध्ये दंतउत्पत्ती चांगली निर्माण होण्यासाठी। कॅल्शियमची आवश्यकता असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ज्ञानदान करून एकमेकांचे ऊर्जास्रोत व्हा

## न्या. अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'न्यू आर्ट्स' मध्ये उत्साहात साजरी

नगर – क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण कार्य समजून घेताना जोतिराव फुले यांची वैचारिक जडणघडण अगोदर समजून घेतली पाहिजे. शिक्षणाच्या सुविधाच नव्हे तर पोषक वातावरण नसताना देखील त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाची रुजवात केली. स्वातंत्र्यपूर्वी समानता पाहिजे आणि ती शिक्षणामुळे येऊ शकते ही भावना त्यामागे होती. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आपण शिक्षण घेत आहोत, मात्र त्याचे ज्ञानात रूपांतर करण्याची गरज आहे. कारण अविद्येने किती अनर्थ होतात हे जोतिराव फुले यांनी आधीच सांगून ठेवले आहे. ज्ञानाचा वसा जोतिरावांनी दिला आणि सावित्रीबाईंनी शिक्षण दिले याची जाणीव ठेवून शिक्षणाला नोकरीचे मापदंड लावण्यापेक्षा ज्ञानाची कास धरा. ज्ञानदान करून एकमेकांचे ऊर्जा स्रोत व्हा, असे प्रतिपादन प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.



न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करुन अभिवादन करण्यात आले.

शहरातील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून न्या. अंजू शेंडे बोलत होत्या. महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून न्यायाधीश तथा अहमदनगर जिल्हा विधी प्राधिकरणच्या सचिव भाग्यश्री पाटील उपस्थित होत्या. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, कार्यकारिणी सदस्य कल्पना वायकर, निमाताई काटे, अलका जंगले, राधाकृष्ण आढाव, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, कला शाखेचे समन्वयक डॉ. किसन अंबाडे, समन्वयक प्रा. सुषमा दरे आदी उपस्थित होते.

न्या. अंजू शेंडे यांनी सांगितले की, शिक्षण महत्त्वाचे आहे म्हणून आपण शिकून आपल्या परीने व्यक्त व्हायला लागलो. परंतु, स्वतः भोवती कोष तयार करून संकुचित सुद्धा झालो. सावित्रीबाईंनी मी शिकले, मोठी झाले असा तोरा मिरवला असता तर आपण येथे नसतो. शिक्षणातून मिळणार्या ज्ञानाची शक्ती अफाट आहे. आपण ह्या ज्ञान शक्तीचा वापर इतरांसाठी करावा. सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्ती दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमांतून जनजागृती व्हावी. आपल्यामध्ये नवीन विचार रुजावे, चांगले मत तयार व्हावे आणि त्या मतांचा कुटुंबावर आणि पुढे समाजावर सकारात्मक परिणाम व्हावा, अशी अपेक्षा देखील न्या. अंजू शेंडे यांनी व्यक्त केली.

न्या. भाग्यश्री पाटील यांनी लहान मुले व महिलांसाठी असणाऱ्या विशेष कायदेविषयक योजनांची माहिती दिली. बालकांच्या हक्कांचा संकोच होऊ नये म्हणून बालस्नेही योजनेअंतर्गत अधिकारमित्र कार्यरत आहेत. तसेच मनोविकलांगांसाठी मनोन्याय योजना राबविण्यात येत आहे. त्याबाबत जास्तीत जास्त जनजागृती करण्याचा व पीडितांचे प्रश्न सोडविण्याचा विधी सेवा प्राधिकरणाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. महिला व बालकांसाठी आता अस्तित्वात असणार्या कायद्यांचे मूळ फुले यांच्या कार्यात आहे, असे त्या म्हणाल्या. पुढे त्यांनी सांगितले की, स्त्री भ्रूण हत्या बंदी कायदा आता आहे, परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात फुले यांनी बाल हत्या प्रतिबंधक गृह सुरू करून भ्रूण हत्या रोखण्याचा मार्ग दाखवला. ॲट्रॉसिटी ॲक्ट आता लागू आहे, मात्र अस्पृश्यतेविरोधात आवाज उठवून समानतेची कास धरणारे फुले अग्रणी होते. आजवर अनेक समाजसुधारक व विचारवंतांनी वारंवार सांगून देखील समाजातील मुली– महिलांची परिस्थिती पूर्णपणे बदललेली नाही. मुलगी नको ह्या मानसिकतेतून विकृत घटना घडताना दिसतात. स्त्रियांवर अत्याचार होतात. अशा परिस्थितीत सावित्रीच्या लेकींनी फक्त शिक्षणावर न थांबता सावित्रीबाईसारखे धैर्य अंगी बाणले पाहिजे, आणि पुरुषांनी जोतिराव झाले पाहिजे.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी संस्थेची सर्व शाळा व महाविद्यालये ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहेत असे सांगितले.

सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेचा इतिहास कथन सांगून चौथे छत्रपती शिवाजी महाराज तसेच राजर्षी शाहू महाराज यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच ग्रामीण भागांतील मुला–मुलींना शालेय व उच्च शिक्षणाच्या संधी देऊन एक प्रकारे फुले दाम्पत्याचे काम आम्ही पुढे नेत आहोत, अशी भावना देखील व्यक्त केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीची सविस्तर माहिती दिली. तसेच महाविद्यालय राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

दरम्यान 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन व कार्य' या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. मान्यवरांच्या हस्ते प्रथम पारितोषिक महेश जनार्दन उशीर यास देण्यात आले. गौरी शहाजी गदादे व धनश्री बाळासाहेब खराडे यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक सायली अरविंद माहेश्वरी हिला मिळाले. दरवर्षी विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणार्या विद्यार्थिनींना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदा संगीत विशारद झाल्याबद्दल संगीत विभागातील आसावरी संजय पंचमुख, विज्ञान आविष्कार स्पर्धेतील यशाबद्दल ऋतुजा विठ्ठल सावंत, तसेच ऑल इंडिया थल सेना कॅम्प, दिल्ली येथे सहभागी झाल्याबद्दल साक्षी दिनेश बोगा या विद्यार्थिनी पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.

प्रास्तविक प्रा. एस. बी. दरे यांनी केले तर प्रा. एस. एम. मोटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपाली जगदाळे यांनी केले आणि प्रा. संगीता निंबाळकर यांनी आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



स्त्री शिक्षक साहित्य संमेलनात अनिता काळे यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरव करताना ज्येष्ठ विचारवंत कॉ. किरण मोघे आदी.

# स्त्री शिक्षक साहित्य संमेलनात अनिता काळे यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरव

नगर – येथील भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरविण्यात आले. स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे दादा पाटील महाविद्यालय मराठी विभागातर्फे तिसरे स्त्री शिक्षक साहित्य संमेलन पार पाडले. या कार्यक्रमात संमेलनाचे उद्घाटक ज्येष्ठ विचारवंत कॉ. किरण मोघे यांच्या हस्ते काळे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संमेलनाचे निमंत्रक आमदार रोहित पवार, स्वागताध्यक्ष राजेंद्र फाळके, संमेलनाध्यक्षा डॉ. वंदना महाजन, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके, बाळासाहेब साळुंके, सुभाषचंद्र तनपुरे, निर्मलाताई पाटील, मंगलताई पाटील, विमल माळी, प्राचार्य डॉ. संजय नगरकर उपस्थित होते.

अनिता काळे या जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, सर्वसामान्य घटकातील मुला–मुलींना विद्या दानाचे पवित्र कार्य करुन शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी ज्युदो व लाठी–काठीचे प्रशिक्षण मोहिम चालवित आहे. तर जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवून त्यांनी शाळेचा कायापालट केला आहे. सावित्रीबाई फुले यांचा वैचारिक वारसा त्या पुढे चालवत आहे. गेल्या दोन दशकापासून त्या जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून सामाजिक कार्यात योगदान देत आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी उद्योग, व्यावसायिक प्रशिक्षण राबविणे, विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान, चर्चासत्राच्या माध्यमातून महिलांना मार्गदर्शन करत आहेत.

महिला सक्षमीकरणाचे कार्य करुन त्यांनी उत्तम प्रकारे महिलांचे संघटन केले आहे. व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ऋचा बोगा सिल्व्हर मेडलची मानकरी

नगर – रायपूर छत्तीसगड येथे झालेल्या ६८ व्या राष्ट्रीय शालेय कूराश स्पर्धेत सिद्धीबाग येथील यंग मेन्स ज्युडो असोसिएशनची ज्युडो हॉलमधील खेळाडू कु. ऋचा बोगा हिने महाराष्ट्र संघांसाठी ४४ किलो खाली गटात सिल्व्हर मेडल मिळविले असून ती इयत्ता ८ वी मध्ये भाऊसाहेब फिरोदिया शाळेत शिकत आहे.



६८ व्या राष्ट्रीय शालेय कूराश स्पर्धेत कु. ऋचा बोगा हिने महाराष्ट्र संघांसाठी ४४ किलो खाली गटात सिल्व्हर मेडल मिळवल्याबद्दल तिचे अभिनंदन करताना अंकुश नागर, शुभम दातरंगे, पालक राकेश बोगा.

तिला प्रशिक्षक व मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर व राष्ट्रीय विजेते आदित्य धोपावकर, महाराष्ट्र कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर, सहाय्यक मार्गदर्शक शुभम दातरंगे महाराष्ट्र कुराश असोसिएशनच्या टेक्निकल डायरेक्टर सोनाली साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



लुई बेल जयंती दिनानिमित्ताने आकांक्षा पुनर्वसन केंद्राच्या वतीने नेवासे तालुक्यातील खेडले काजळी या गावातील बाबासाहेब पाथे (अंध) व सौ. सुनिता पाथे यांना व्यवसायासाठी आटा चक्की व शेड प्रदान करण्यात आली. (छाया– उदय जोशी)

# दिव्यांग दांपत्यास व्यवसायासाठी आटाचक्की व शेड प्रदान

नगर – लुई बेल जयंती दिनानिमित्ताने आकांक्षा पुनवसन केंद्राच्या वतीने नेवासे तालुक्यातील खेडले काजळी या गावातील बाबासाहेब पाथे (अंध) व सौ. सुनिता पाथे यांना व्यवसायासाठी आटा चक्की व शेड प्रदान करण्यात आली. यावेळी आकांक्षा पुनवसन केंद्राच्या अध्यक्षा सविता काळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष रामकृष्ण हरि आश्रमाचे संचालक नीलेश रोडे महाराज हे होते.

नीलेश रोडे महाराज म्हणाले सामाजिक बांधिलकीची जाण ठेऊन सातत्याने आकांक्षा ही संस्था समाजातील दिव्यांग बांधवासाठी काम करत आहे. कर्ण बधीर, अंध, मतिमंद व अस्थीव्यंग मुलांमध्ये जाऊन त्यांच्या आनंदात आनंद मानणारे लोक आज कमी आहेत. उजळलेले चेहरे व उल्हासित मनं अनुभवतांना उपस्थितांची मने भरुन आली आहेत. 'निरपेक्षपणे आणि आत्मीयतेने दिव्यांगांसाठी आकांक्षा करीत असलेले काम कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे!

सविता काळे म्हणाल्या स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर करून दिव्यांगांच जगणं आनंदी, समृद्ध बनवण्यासाठी 'आकांक्षा' संस्था गेली २५ वर्ष कार्यरत आहे. दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम आम्ही करत आहोत. दिव्यांगाना सहानभूती नकोय त्याच्या हाताला काम हवे आकांक्षा अश्या व्यक्तिच्या नेहमी पाठीशी आहे व राहील. खेडले काजळी ग्रामपंचायत गावकऱ्यांच्या सहकार्याने दुकानासाठी जागा उपलब्ध करून दिली हे आदर्शवत आहे.

उपसरपंच बाबासाहेब शिरसाठ, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अंबादास कोरडे, ह.भ.प. नामदेवमहाराज उदे, कार्यकर्ते शहनाज शिरसाठ, संदीप ढगे यांनी मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय दृष्टीहीन संघटनेचे प्रमुख गोरख दरंदले यांनी लुई ब्रेलविषयी माहिती दिली. बाबासाहेब पाथे यांनी आभार मानले.

# राधेचे आध्यात्मिक क्षेत्रातील भक्ती स्वरूपा कार्य शृंगारापेक्षाही मोठे

## प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांचे प्रतिपादन; राधेच्या जीवनावरील मराठीतील पहिल्या पौराणिक कादंबरीचे उत्साहात पुनर्प्रकाशन व स्वागत

नगर – राधाकृष्ण हे प्रेम व भक्तीचे मूर्तिमंत स्वरूप असून सर्वांच्या मनात त्यांनी अढळ स्थान त्यांनी निर्माण केले आहे. जेव्हा आपण श्रीकृष्णाची शक्ती व सृष्टिरूप अविष्कार म्हणून राधे कडे पाहतो तेव्हा ती दैवी स्वरुपात आपल्याला दिसते तर लौकिक अर्थाने जेव्हा आपण राधेकडे पाहतो तेव्हा ती सामान्य स्त्री म्हणूनच आपल्या भासते. पण आजपर्यंत राधा केवळ शृंगार रसाच्या गवळणीतूनच आपल्या समोर मंडली गेली. मात्र राधेचे आध्यात्मिक भक्तीस्वरूपा कार्य हे शृंगारा पेक्षाही किती मोठे आहे हे 'राधा' या कादंबरीतून आपल्या कळते. राधेच्या जीवनावर मराठीतील पहिलीच कादंबरी लिहिताना प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी राधेचे दैवी व लौकिक रूप या दोन्हीही बाजू लालित्यपूर्णतेने मांडून आव्हानात्मक व अतिशय परिणामकरक लिखाण केले आहे. राधाकृष्णाच्या लीला, रासक्रीडा ते राधेचा शेवट या कादंबरीत असल्याने ही कादंबरी वाचताना आपण कृष्णमय व राधामय होऊन जातो, असे प्रतिपादन पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले.



अहिल्यानगरचे लेखक प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे लिखित 'राधा' या पौराणिक कादंबरीचे पुनर्प्रकाशन व स्वागत करताना पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित व स्त्री शक्तीच्या हस्ते झाले. यावेळी किसनराव तरटे, डॉ. दिलीप धनेश्वर आदींसह ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे अभ्यासक.

राधेच्या जीवनावर प्रकाश टाकणारे मराठीतील साहित्य नाहीये. अहिल्यानगरचे संत व लोक साहित्याचे अभ्यासक लेखक प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे लिखित 'राधा' या पौराणिक कादंबरीचे प्रकाशन नुकतेच पुणे येथे झालेल्या ग्रंथोत्सव मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या काही निवडक ग्रंथ व कादंबऱ्यां बरोबर झाले. त्यानंतर अहिल्यानगर येथे आनंद विद्यालयातील श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात 'राधा' कादंबरीचे पुनर्प्रकाशन तथा स्वागत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांच्या सह स्त्री शक्तीच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आनंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव किसनराव तरटे, आनंद विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर, डॉ. दिलीप धनेश्वर, लेखक प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे आदींसह ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे अभ्यासक उपस्थित होते.

किसनराव तरटे म्हणाले, अध्यात्मा शिवाय पर्याय नाही हे भारताने सर्व जगाला दाखवून दिले आहे. डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी या वयातही लेखनाच्या माध्यमातून केलेली अध्यात्माची सेवा व लेखन कौतुकास्पद आहे. डॉ. दिलीप धनेश्वर यांनी श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर स्वर्णमहोत्सवी जयंती महापर्व व वाचन संस्कृती संवर्धन चळवळी अंतर्गत श्री ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाच्या वतीने आनंद विद्यालयास कृतज्ञतापूर्वक विविध ग्रंथांची भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीनाक्षी मालुंजकर यांनी केले. प्रा.ऋता ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले तर उषा सहस्रबुद्धे यांनी आभार मानले.

यावेळी स्वाती ननावरे, सीमा सोले, सुजाता नरसाळे, इंदु खेडकर, सौ.महापुरुष, प्रा. डॉ.राजू रिक्कल, प्रा.डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, प्रा.सुदाम देवखिळे आदी ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गातील सर्व अभ्यासक उपस्थित होते.

यावेळी वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सर्वांनी प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे लिखित राधा, अगस्त्य व नारद या कादंबऱ्या विकत घेऊन प्रतिसाद दिला.

# ऊर्जा संवर्धन राष्ट्रीय चळवळ व्हावी : डॉ.बाबासाहेब खरबस

नगर – देशातील एकूण वीज उत्पादना मध्ये ६७ टक्के वाटा कोळशा पासून वीज निर्मितीचा आहे, ज्या पासून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते असे नमूद केले. कोणत्याही देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न किती आहे हे वीजेचा वापर किती आहे यावर निर्धारित करते. विकसीत देशांत दर मानसी वार्षिक सरासरी वीज वापर ३००० kWh आहे, तर आपल्या देशाचा तो खूपच कमी आहे, जो १००० kWh वर नेण्याचे आपले उद्दीष्ट आहे. आपल्या देशामध्ये वीज वहन गळती मोठ्या प्रमाणावर असून, एक यूनिट वीजेची बचत म्हणजे दोन यूनिट वीज निर्मिती करण्यासारखे आहे, असे दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहमदनगर स्थानिक केंद्राच्या वतीने ३ जानेवारी रोजी ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त ऊर्जा संवर्धंन व बचत या विषयावर व्याख्यान देताना शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब खरबस यांनी यांनी नमूद केले.





दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) आयोजित ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त बोलताना डॉ. बाबासाहेब खरबस.

## दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) आयोजित ऊर्जा संवर्धन दिन साजरा

वाढते औद्योगीकरण, बदलती जीवनशैली, वाढत्या वाहन सुविधा, वाढती लोकसंख्या यामुळे वीजेची मागणी व पुरवठा यामधील दरी वाढतच चालली आहे. वीजेच्या वाढत्या मागणीमुळे पारंपारिक ऊर्जा निर्मिती संसाधनांवर अतिरिक्त भार पडत आहे, त्यामुळे ती लवकर नष्ट होण्याचा धोका संभवतो. देशाच्या एकूण वीज उत्पादनापैकी ५० टक्के वीजेचा वापर औद्योगिक क्षेत्रात होतो, व त्यातही ७० टक्के वीज सीमेंट, खते, कापड उद्योग, स्टील व लोखंड उद्योग, कागद निर्मिती या कारखान्यांत होतो. या कारखान्यांमध्ये १५ ते २० टक्के वीज बचत होऊ शकते असे त्यांनी नमूद केले. त्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या उपाय–योजनांची त्यांनी माहिती दिली.

यावेळी वीज बील कसे वाचावे यावर त्यांनी मार्गदर्शन केले. घरगुती वीज वापरातही योग्य नियोजन केले, वीज बचत करणारी उपकरणे वापरली तर १० ते १५ टक्के वीज होऊ शकते असे त्यांनी सोदाहरण नमूद केले.

सुरूवातीला इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स चे अध्यक्ष भारतभूषण भागवत व माजी अध्यक्ष मनोहर अणेकर यांनी डॉ. खरबस यांचा सत्कार केला. म ानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी प्रास्ताविक केले व सह–मानद सचिव डॉ. दादासाहेब करंजुले यांनी आभार प्रदर्शन केले.

व्याख्यानाला संस्थेचे सभासद रामनाथ वायकर, हरिश्चंद्र थिगळे, प्रदीप तांदळे, विश्वनाथ आदवडे, तसेच विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत ८ जानेवारीला होणार 'सभागृहाचा लोकार्पण सोहळा'

नगर – निसर्ग सृष्टी गोपालन संस्था संचलित श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज गोशाळा, पन्यास चंद्रशेखर विजय महाराज साहेबांच्या कृपाशिर्वादाने श्री भगवान महावीर जीव दया निवारा शेड, स्व.सौ.सुनंदा दिगंबर जोशी सभागृह लोकार्पण सोहळा आणि गोमाता मुक्तसंचार गोठा भूमीपूजन सोहळा ८ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत गंगागिरी महाराज संस्थान, गोदाघाम सरला बेटचे मठाधिपती महंत गुरुवर्य हभप रामगिरी महाराज तर विदर्भरत्न रामायणाचार्य ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. तर प्रमुख उपस्थितीत प्रज्ञाचक्षु गुरुवर्य मुकुंद काका जाटदेवळेकर महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे (संत तुकाराम महाराज यांचे १० वे वंशज) ह.भ.प. माणिक महाराज मोरे (देहू येथील संतश्रेष्ठ तुकाराम महाराज दिंडी चे प्रमुख) आदी संतांच्या प्रमुख उपस्थितीत तर राजुभाई शाह (वर्धमान संस्कारधाम, मुंबई), महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, भाऊराव कुदळे, (क्षेत्रीय गोसेवा प्रमुख विहीप, महाराष्ट्र व गुजरात राज्य), विवेक कुलकर्णी (क्षेत्रीय संयोजक, बजरंगदल, महाराष्ट्र राज्य), सुजय विखे पा., आ. शिवाजीराव कर्डिले, आ.संग्राम जगताप, आ.काशिनाथ दाते, प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, दीनदयाळ परिवाराचे संस्थापक अध्यक्ष वसंत लोढा, समस्त गोरक्षा आघाडीचे अध्यक्ष मिलींद एकबोटे, उद्योजक भिमराव फुंदे, महेश इंदानी, भगवान फुलसौंदर, भाजपाचे नितीन उदमले, महेश रेखीव, इसळकचे सरपंच संजय गेरंगे आदींच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व गोभक्तांनी, हिंदू धर्म बांधवांनी व जिल्ह्यातील गोरक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक

दिंगबर जोशी, उद्योजक धनंजय जोशी, संस्थेचे अध्यक्ष डॉ.विलास जाधव, सचिव गौतम कराळे, उपाध्यक्ष विश्वास बेरड, खाजिनदार गजेन्द्र सोनवणे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, उद्योजक अपुर्व गुजराथी, ललित चोरडिया, मुकल गंधे, भुषण भणगे, श्रीकांत साठे, हभप रविन्द्रनाथ महा.सुद्रिक, हिंदू राष्ट्र सेनेचे अध्यक्ष संजय आडोळे यांनी केले आहे.

# साहित्य वाचनाने व्यक्तीच्या जीवनात अमुलाग्र बदल होतो

## रा. ह. दरे यांचे प्रतिपादन; न्यू आर्टस् महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत ग्रंथ प्रदर्शन


महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रम अंतर्गत न्यू आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, (स्वायत्त) अ.नगर येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रा. ह. दरे यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – सागर इंगळे)

नगर – ग्रंथ प्रदर्शनात उपयोगी असा ग्रंथसंग्रह आहे. आजच्या मोबाईल इंटरनेटच्या जगात वाचकांची संख्या कमी होत आहे. परंतु साहित्य वाचनाने व्यक्तीच्या जीवनात अमुलाग्र बदल होतो त्यासाठी नियमित वाचन केले पाहिजे. प्राचार्यांनीही ग्रंथ प्रदर्शनात अत्यंत उपयुक्त ग्रंथ संग्रह आहे असा उल्लेख केला व विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनासाठी व ज्ञानार्जनासाठी निश्चितच उपयोग होईल, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रम अंतर्गत न्यू आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, (स्वायत्त) अ.नगर येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे उद्‌घाटन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रा. ह. दरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. बी. सागडे, वाणिज्य शाखाचे उपप्राचार्य डॉ.एस. बी. कळम कर, विज्ञान शाखा उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, कला शाखेचे समन्वयक डॉ. किसन अंबाडे, उपक्रम समन्वयक प्रा.डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, ग्रंथालय समितीचे चेअरमन डॉ.एच.डी. जगताप, ग्रंथपाल श्रीमती संगीता निमसे, प्रबंधक बी. के. साबळे, अधीक्षक आर.एन. पाटील, अधीक्षक जे.जी. सावळे व उपक्रम समिती सदस्य महाविद्यालयाच्या विविध विभागाचे विभागप्रमुख प्राध्यापक व प्रशासकिय सेवक वृंद, विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

पुढे बोलतांना संस्थेचे अध्यक्ष म्हणाले की, ग्रंथ प्रदर्शन पाहून मुलांना देखील वाचनाची गोडी लागलेली आहे असे दिसते की मुले ग्रंथ पाहतात व चाळतात तर त्यांची ही वाचनाची आवड पाहून वाचन संस्कृती कशी वाढेल व वाचनाची गोडी कशी राहिल यासाठी संस्था अधिकाधिक प्रयत्नशील राहिल. ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घाटन प्रसंगी ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले.

ग्रंथ प्रदर्शनास संस्थाचालक, प्राध्यापक, संशोधक व प्रशासकिय सेवक वृंद, विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. ग्रंथप्रदर्शन यशस्वितेसाठी श्रीमती सविता डांगे, चेतन साळवे, श्रीराम बनसोड, विजय म्हस्के, के.एन. मते व इतर ग्रंथालय सेवक वृंद यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय महोत्सवात 'विकास भी, विरासत भी' यावर सादरीकरणाची नगरच्या यश सोमानी यास संधी

## दिल्लीत थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर सादरीकरण करणार


राष्ट्रीय महोत्सवात 'विकास भी, विरासत भी' यावर सादरीकरण करण्याची नगरच्या यश सोमानीला संधी मिळाल्याबद्दल त्याचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. राकेशकुमार जैन आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयोजिका प्रा.शितल सोलंकी.

नगर – मूळचा नगरचा व पुणे येथील अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठातील बी.टेक.कॉम्प्युटर सायन्सच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेला व राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी यश योगेश सोमानी याने भारत सरकारच्या युवक व क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवात आपल्या कामगिरीने यश प्राप्त केले आहे. विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२४ अंतर्गत स्पर्धा घेण्यात आली. यात पहिल्या दोन टप्प्यातील प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धेत यश मिळवत त्याने तिसरा टप्पा गाठला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय उत्तराखंड यांच्यातर्फे डेहराडून येथील दून विश्व विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी आव्हाने स्पर्धेत त्याने तिसरा टप्पाही पार केला. त्याला आता दिल्लीत ९ ते १२ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर 'विकास भी, विरासत भी' या विषयावर सादरीकरण करण्याची संधी मिळाली आहे. तो दून विश्वविद्यापीठाचा टिम लिडर म्हणून प्रतिनिधीत्व करणार आहे.

अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ.राकेशकुमार जैन आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयोजिका प्रा.शितल सोलंकी यांनी यशचा सत्कार करून अभिनंदन केले. यश सोमानी हा नगरमधील महेश्वर प्रिंटर्सचे संचालक योगेश व ज्योती सोमानी यांचा मुलगा आहे. त्याचे शालेय शिक्षण नगरमध्येच सेक्रेट हार्ट हायस्कूलमध्ये झालेले आहे.

# नगर शहरात १२ जानेवारी रोजी राज्यस्तरीय बालभजन महोत्सव



कु.स्वरा मंगेश लाड चि.अन्वित सचिन रणसिंग

नगर – बालगायक/वादकामध्ये अध्यात्मिक धार्मिक संस्कार रुजावेत, संगीत साधनेच्या त्यांच्या आवडीला प्रोत्साहन मिळावे या हेतूने १२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात टिळकरोड वरील लक्ष्मीनारायण कार्यालयात १५ वे राज्यस्तरीय श्री सत्यसाई बालभजन महोत्सव होत असल्याची माहिती संयोजक अशोक कुरापाटी यांनी दिली.

या महोत्सवात राज्यभरातील सुमारे १५० बालगायका वादक सहभागी होत असून त्यांचे फोटोसह माहिती असलेल्या गौरविकेचे यावेळी प्रकाशन होत आहे.

अल्पवयात संगीत साधनेत चमकदार कामगिरी बजावणारे दूरदर्शन वाहिनीवरील मी होणार सुपरस्टार पर्व ३ मधील सर्वोकृष्ट मानकरी यवतमाळची स्वरा मंगेश लाड, बावधन पुणे येथील अन्वित सचिन रणसिंग यांची उपस्थिती असून त्यांच्य सुश्राव्य गायनाने महोत्सवाची सुरुवात व दुपारी २ ते ४ या वेळात त्यांची नगरच्या रसिकांसाठी मैफिल सादर होणार आहे. त्यांच्याच हस्ते सहभागी बालगायकांना स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, गौरविका देवून सन्मानित केले जाणार आहे. या सांगीतिक मनस्वी आनंदी सोहळ्यात सहभागी होवून उमलत्या पिढीकडून अध्यात्मिक भजनांचा स्वरानंद मिळवावा असे आवाहन कुरापाटी यांनी केले आहे.

यवतमाळची स्वरा लाड (वय १२ वर्ष) हिने वयाच्या ३ र्या वर्षापासून गायनाला व वयाच्या ७ व्या वर्षापासून शास्त्रीय संगीतास सुरुवात केली विविध देश-राज्यस्तरीय संगीत स्पर्धेत तिने सुमारे १३० पारितोषिके मिळविले असून शास्त्रीय संगीताच्या तीन परीक्षा विशेष गुणवतेसह उत्तीर्ण झाली आहे. दूरदर्शन वाहिनीवरील मी होणार सुपरस्टार पर्व ३ मध्ये तिची पहिल्या बारा मानकरी स्पर्धेत निवड झाली आहे. सुरेल आवाज, गाण्याची फिरत, स्वस्ताल लयीची उपजत समज आहे. शास्त्रीय, सुगम संगीत बळावर संगीत जगतात वेगळा ठसा उमटवित आहे.

बावधन पुणे येथील अन्वित सचिन रणसिंग वय १२ वर्षे याने वयाच्या ५ व्या वर्षापासून गुरु मधुवंती ब्तेरगांवकर यांचेकडे संगीताचे धडे गिरविले. संगीताच्या चार परीक्षा विशेष गुणवतेसह उतीर्ण. पुण्यात जय विजय या गायन स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक पटकविला.

दूरदर्शन वाहिनीवरील मी होणार सुपरस्टार पर्व ३ मध्ये त्याने आपल्या मधुर आवाजाने नामवंत परीक्षक व राज्यातील संगीत प्रेमींची मने जिंकली आवाजात कमालीची सुरेलता, तानेची स्वच्छ फिरत, विविधता लयकारी, आलापीची मांडणी, वाणाचे गमक गीत मेहनत घेवून या क्षेत्रात झेप घेत आहे.

# माजी आमदार दादाभाऊ कळमकरांचे कार्य प्रेरणादायी

## शहराध्यक्ष सागर चाबुकस्वार यांचे प्रतिपादन; भिंगार काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार


अहिल्यानगर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार भिंगार शहर काँग्रेस कमिटी तर्फे करण्यात आला.

नगर – दादाभाऊ कळमकर हे गेल्या ४० वर्षांपासून राजकीय व सामाजिक काम करत आहेत. त्यांनी आपल्या आमदारकी च्या काळात भिंगार शहरात अनेक विकासकामे केली. त्यामध्ये पंचशीलनगर व भिमनगरमध्ये बुध्द विहार बांधून दिले. असे भरपुर विकासकामे केली. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे निष्ठावंत नेते म्हणून ओळखले जातात. वयाची ८० वर्षे पुर्ण करुन त्यांनी ८१ वर्षात पदार्पण केले तरीही या वयात त्यांचे काम चालू आहे. त्यांचे कार्य आमच्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन भिंगार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सागर चाबुकस्वार यांनी केले.

अहिल्यानगर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार भिंगार शहर काँग्रेस कमिटीतर्फे करण्यात आला. यावेळी सागर चाबुकस्वार, कार्याध्यक्ष बाळासाहेब भिंगारदिवे, सह भिंगारचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी दादाभाऊ कळमकर म्हणाले प्रामाणिकपणे पक्षनिष्ठ राहून काम केल्यास पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडून आपल्याला मोठी जबाबदारी मिळते आणि या जबाबदारीच्या माध्यमातून खरंतर आपण सर्वसामान्यांचे अडीअडचणी प्रश्न अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केल्यास आपल्याला जनता आणि पक्ष नेहमीच उच्च पदावर ठेवत असतो. मी सुरुवातीपासून शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली काम केलेला आहे, त्यामुळे माझे काम हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली असेच चालू राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी कार्याध्यक्ष बाळासाहेब भिंगारदिवे, उपाध्यक्ष संतोष धिवर, लखन छजलानी, प्रल्हाद भिंगारदिवे आदी उपस्थित होते.


टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने मथुरा (उत्तर प्रदेश) येथे १९ वर्षे वयोगटात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. यावेळी विजेत्या संघासोबत महाराष्ट्र टेनिस क्रिकेटचे प्रशिक्षक घनश्याम सानप, एनसीसी विभाग प्रमुख संतोष जाधव, सुरेखा टेमकर, मनीषा आढाव, शैलेश परदेशी आदींसह खेळाडू.

# राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद

## अहिल्यानगरच्या लेकी चमकल्या; महाराष्ट्राचे केले प्रतिनिधित्व

नगर – टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने मथुरा (उत्तर प्रदेश) येथे १९ वर्षे वयोगटात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. सदर मुलींच्या संघाने राज्यात प्रथम येऊन महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते.

नुकतेच झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत उत्तर प्रदेशचा ३५ धावांनी पराभव करून राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळविले. महाराष्ट्राच्या संघात सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय राहुरी कृषी विद्यापीठाच्या ११ मुलींचा सहभाग होता, तर महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून सावित्रीबाई फुले विद्यालयाचे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक घनश्याम सानप यानी काम पाहिले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांत पाटील, शिक्षण मंडळाचे सचिव महानंद माने, खजिनदार महेश घाडगे, सावित्रीबाई फुले विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहिरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, टेनिस क्रिकेट असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष कन्हैया गुजर, राज्य तसेच राष्ट्रीय टेनिस क्रिकेटच्या सचिव मीनाक्षी गिरी, धनश्री गिरी, अहिल्यानगर टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष केशव नागरगोजे, खजिनदार संदीप घावटे आदींनी अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद पटकाविणारे महाराष्ट्राच्या मुलींचा संघ पुढीलप्रमाणे – अक्षदा बेलेकर (कर्णधार), स्वामिनी जेजुरकर, ऐश्वर्या चौरसिया, वृषाली पारधी, मृणाल ननवरे, सिमरन शेख, संतोषी भिसे, प्रणाली पानसंबळ, साक्षी बनकर, श्रावणी ढगे, राशी पवार, धनश्री शेडगे.

# प्राणायाम बरोबर आहार आणि विचार महत्त्वाचे

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; आनंद योग केंद्राचा स्थापना दिवस निरोगी व सदृढ आरोग्याचा जागर करुन साजरा


आनंद योग केंद्राचा स्थापना दिवस निरोगी व सदृढ आरोग्याचा जागर करुन साजरा करण्यात आला.

नगर – प्राणायाम बरोबर आहार आणि विचार महत्त्वाचे आहेत. सध्या विचांराचे प्रदूषण झाले आहे. त्याला आवर घातला पाहिजे. महात्मा गांधी यांनी वयाच्या पाचव्या वर्षी राजा हरीशचंद्र नाटक पाहिले आणि त्यांचे जीवन बदलून गेले. आयुष्यभर सत्य, अहिंसेचे पालन केले. स्मार्टफोन व अद्यावत तंत्रज्ञान पेटलेली मशाल असून, चांगल्या लोकांच्या हातात असेल तर ती मार्ग दाखवेल. वाईट लोकांच्या हातात दिली तर जाळून टाकेन, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

सावेडी येथील शुभमंगल कार्यालयात आनंद योग केंद्राच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आयुक्त डांगे बोलत होते. आनंद योग केंद्राचा स्थापना दिवस निरोगी व सदृढ आरोग्याचा जागर करीत साजरा करण्यात आला. मागील पाच वर्षापासून आनंद योग केंद्राच्या माध्यमातून योगाचा प्रचार-प्रसार सुरु असून, नागरिकांसाठी योग वर्ग घेऊन समाजात आरोग्याप्रती जागृतीचे कार्य केले जात आहे.

पुढे डांगे म्हणाले की, आपल्या देशाला निसर्गाने भरभरुन दिले आहे. जीवनात पर्यटनाचा आंनद घ्या. भारतासारखी भौगोलिक परिस्थिती जगात फक्त दोन-तीन देशात आहे. आपल्या देशात बर्फाची शिखरे, रखरखीत वाळवंटे, सुंदर समुद्र किनारे निसर्गाने व जाती-धर्माने नटलेली विविधता असल्याचे स्पष्ट करुन आरोग्यासाठी नियमीत योगा करण्याचे त्यांनी आवाहन केले.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाले. केंद्रप्रमुख दिलीप कटारिया यांनी योग व प्राणायामाने निरोगी जीवन जगता येते. योगाभ्यास नियमितपणे केला पाहिजे. समाज निरोगी करण्यासाठी आनंद योग केंद्रात जास्तीत-जास्त योग शिक्षक तयार करण्याचे कार्य सुरु आहे. घराघरात योग पोहचविण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून कार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

चंद्रशेखर सप्तर्षी यांनी आनंद योग केंद्राच्या माध्यमातून मागील पाच वर्षात योगाच्या प्रचार-प्रसारासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमात मिलिंद नेवासकर यांनी प्रशांत बिहाणी, दिलीप पवार, उषा पवार, सोनाली जाधववार, प्रतीक्षा गीते, पूजा ठमके, मनीषा जायभाय, स्वाती वाळुंजकर या योग शिक्षकांचा सत्कार केला. राजेंद्र चौधरी, श्रीकांत निंबाळकर, सुभाष भंडारी, स्मिता उदास, स्मिता पाटील, निहाल कटारिया यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# न्यू लॉ कॉलेजमध्ये ११, १२ जानेवारीला 'राज्यस्तरीय अभिरुप न्यायालय स्पर्धा'

नगर – न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर येथे कै. न्यायमुर्ती एस. बी. म्हसे पा. सातव्या राज्यस्तरीय अभिरुप न्यायालय स्पर्धेचे ११ आणि १२ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन न्यायमुर्ती ए. आर. पेडणेकर, उच्च न्यायालय मुंबई यांचे हस्ते स. ९ वा. होणार असून अध्यक्षस्थान अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे हे भुषविणार आहेत तर बक्षिस वितरण समारंभ १२ जानेवारी रोजी न्यायमुर्ती आर. एम. जोशी, उच्च न्यायालय मुंबई यांचे हस्ते सकाळी ११.३० वा. होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षपद अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील हे भूषविणार आहेत. स्पर्धेसाठी राज्यभरातून विविध विधी महाविद्यालयातून स्पर्धकांचा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी दिली.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव अ‍ॅड. व्ही. डी. आठरे पा., खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे पा., अ‍ॅड. माणिकराव मोरे, अ‍ॅड. माधवेश्वरी म्हसे पा., अ‍ॅड. सुभाष भोर आदींची स्पर्धा संयोजन समिती असून त्यांना महाविद्यालयाचे स्पर्धा समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, डॉ. बाळासाहेब पांढरे, डॉ. अतुल मोरे, कार्यालयीन अधिक्षक एच. एम. कदम यांचे सहकार्य लाभत आहे.

अभिरुप न्यायालय स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निष्णात वकिल होण्याचे तंत्र अवगत होऊन न्यायालयामध्ये वक्तृत्व गुण आणि केसेस मांडण्याची उत्तमरित्या जबाबदारी सांभाळता येते. यावेळी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष, डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे, व सर्व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळ उपस्थित राहणार असल्याचे यावेळी प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी सांगीतले.

# सावित्री ज्योती महोत्सवांतर्गत ९ ते १२ जानेवारी दरम्यान मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन



नगर – गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात ९ ते १२ जानेवारी दरम्यान सालाबाद प्रमाणे सावित्री ज्योती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष किशोर डागवाले व डॉ. दिलीप जोंधळे यांनी दिली.

जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत युवक कल्याण योजनेमार्फत जय युवा अ‍ॅकॅडमी, समर्पण बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उडान फाउंडेशन, रयत प्रतिष्ठान, प्रगती फाउंडेशन, जीवन आधार प्रतिष्ठान, अहिल्या फाउंडेशन, मुंबादेवी प्रतिष्ठान, समाज परिवर्तन संस्था आदींच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालय, संपूर्ण सुरक्षा केंद्र, बाळासाहेब देशपांडे रक्तपिढी, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग, आनंद जनरल हॉस्पिटल, इंडो आयरिश हॉस्पिटल, काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेज, यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज आदींच्या सहयोगातून रक्तदान शिबिर, रक्ताच्या विविध तपासण्या, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, दंत तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, होमिओपॅथी उपचार, हाडांची तपासणी, हृदयरोग, मधुमेह, पाठदुखी, गुडघेदुखी, बालरोग, किडनी विकार, स्त्री आरोग्य तपासणी, आयुर्वेद उपचार पद्धतीवर मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

शिबिरासाठी डॉ. भास्कर रणनवरे, डॉ. अनिल बोरगे, डॉ. कल्पना रणनवरे, डॉ. संजीव गडगे, डॉ. प्रमोद पालवे, डॉ. संतोष गिऱ्हे, डॉ. धनाजी बनसोडे, डॉ. तस्लीमा पठाण, डॉ. सतीश लोंढे, डॉ. अनिता लोंढे, डॉ. सतीश राजुरकर आदी विविध वैद्यकीय तज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत. या शिबिरासाठी जयश्री शिंदे, कांचन लद्दे, संतोष काळे, शिवाजी जाधव, अश्विनी वाघ, कावेरी कैदके, ड. पुष्पा जेजुरकर, आरती शिंदे, पोपट बनकर, बाबू काकडे आदी संस्थांचे प्रतिनिधी प्रयत्नशील आहेत. शिबिरासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर, जिल्हा क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे, विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला, प्रा. हर्षल आगळे, सुहासराव सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.


## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळवण्यात येते कि, ग्रामपंचायत बांगर्डे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर, अंतर्गत खालील काम करण्यासाठी सीलबंद लिफाफ्यात ब-१ निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी दि. ०६/०१/२०२५ ते १४/०१/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायतकडे दाखल करावे.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा विक्री रक्कम | बयाना रक्कम | निविदा रक्कम | योजनेचे नाव | कंत्राटदार वर्ग | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथे घाडगेवस्ती शाळेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे | २३६/- | ०.०० | २५१४५६/- | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०६ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी बाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात दि. ०६/०१/२०२५ ते १४/०१/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा दि.१४/०१/२०२५ पर्यंत सायंकाळी ठीक ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येथील. निविदा उघडण्याची प्रकिया शक्यतो दि. १५/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय बांगर्डे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे पार पडेल. तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्र असावा. सर्व कामाच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील. कामाचे देय काम पूर्ण झाले नंतर मोजमाप पुस्तकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल. कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता, पंचायत समिती श्रीगोंदा यांचे राहील. निविदा मंजूर - नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत बांगर्डे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर ने राखून ठेवला आहे. आवश्यक प्रमाणपत्र. ;- १) जि.प. नोंदणी प्रमाणपत्र २) पॅन कार्ड ३) जि. एस. टी. प्रमाणपत्र. ४) आधार कार्ड ५) कागदपत्र सत्यता पडताळणी बाबत विहित नमुन्यात १०० रुच्या मुद्रांकवर घोषणापत्र जोडून द्यावे.

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर

सरपंच/उपसरपंच
ग्रामपंचायत बांगर्डे ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

सिस्टिमॅटिक लम्पसम विथड्रॉल (एसएलडब्ल्यू) सुविधेअंतर्गत, एनपीएस गुंतवणूकदार आता ६० ते ७५ वर्षे वयोगटातील त्यांच्या जमा निधीपैकी ६० टक्के रक्कम पद्धतशीरपणे काढू शकतात. याचा अर्थ असा की एकरकमी रक्कम काढण्याऐवजी, आपण नियमित अंतराने दीर्घ कालावधीसाठी संपूर्ण रक्कम थोड्या प्रमाणात काढू शकता. या सुविधेमुळे गुंतवणूकदारांना अनेक मोठे फायदे मिळू शकतात. याचा अर्थ आता निवृत्तीनंतर तुमचा पैसा तुमच्यासाठी उपयोगी पडू शकतो आणि त्यातील काही भाग दीर्घकाळ गुंतवलाही जाऊ शकतो. हे तुमच्या कॉर्पसवरील संभाव्य परताव्यात लक्षणीय वाढ करू शकते. याशिवाय सेवानिवृत्तीनंतर आर्थिक गरजेनुसार पैसे काढण्याची सोय ही सुविधा देते. या सुविधेचा सर्वात मोठा फायदा असा आहे की एसएलडब्ल्यूद्वारे काढलेले पैसे करमुक्त आहेत, कारण सेवानिवृत्तीनंतर एनपीएस कॉर्पसच्या ६० टक्के पैसे काढण्यावर कोणताही आयकर लागू होत नाही.

## सिस्टिमॅटिक लम्पसम विथड्रॉलच्या अंतरंगात

**अटी काय आहेत?**

एसएलडब्ल्यू सुविधेचा लाभ घेण्यासाठी काही अटी आहेत. मुदतपूर्व पैसे काढण्यावर ही सुविधा लागू होणार नाही. हा लाभ फक्त मॅच्युरिटीनंतर नियमित पैसे काढल्यावरच मिळू शकतो.

* गुंतवणूकदाराचा मृत्यू झाल्यास किंवा इतर कोणत्याही दुर्दैवी परिस्थितीत करावयाच्या पेमेंटसाठी ही सुविधा उपलब्ध नाही. अशा प्रकरणांमध्ये, संपूर्ण रक्कम नॉमिनी किंवा कायदेशीर वारसाला दिली जाते.

* एसएलडब्ल्यू फक्त ६० टक्के कॉर्पसवर लागू आहे. उर्वरित ४०% रक्कम वार्षिकी योजनेत गुंतवणे अनिवार्य आहे.

**एनपीएस खात्यात एसएलडब्ल्यू कसे सक्रिय करावे?**

माहीत हवे

एनपीएस खात्यात पद्धतशीरपणे एकरकमी पैसे काढणे सक्रिय करण्यासाठी, खालील प्रक्रिया पार पाडावी लागेल.

**एनपीएस खात्यात लॉग इन करा.**

'एक्झिट फ्रॉम एनपीएस' पर्यायावर क्लिक करा आणि 'कंटीन्युशन अँड विथड्रॉअल' मेनू अंतर्गत 'इनिशिएट रिक्वेस्ट' निवडा. तुमचा ईमेल, मोबाईल नंबर आणि बँक खाते तपशील भरून पडताळणी करा.




**आता येथील दोन पर्यायांपैकी एक निवडा** : वयावर आधारित एसएलडब्ल्यू : यामध्ये तुम्हाला ड्रॉपडाउनमध्ये आधीच दिलेली तारीख आणि पैसे काढण्याची वारंवारता निवडावी लागेल. या आधारावर, तुम्हाला एसएलडब्ल्यू अंतर्गत मिळणारी पैसे काढण्याची रक्कम आपोआप मोजली जाईल.

हप्त्याच्या रकमेवर आधारित एसएलडब्ल्यू : यामध्ये तुम्हाला तुमच्या पैसे काढण्याची रक्कम आणि त्याची वारंवारता सांगावी लागेल, त्यानंतर तुम्हाला एसएलडब्ल्यू चा कालावधी कळेल.

निवडलेला पर्याय निवडल्यानंतर, तो प्रमाणीकृत आणि सत्यापित केला जाईल, त्यानंतर तुम्हाला पोचपावती मिळेल.

**हेही लक्षात ठेवा**

तुमच्या एनपीएस खात्यामध्ये सिस्टिमॅटिक लम्पसम विथड्रॉल सुविधा सक्रिय करताना खालील मुद्दे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे: ही सुविधा सक्रिय होण्यासाठी ५ दिवस लागतात.

एकदा सक्रिय झाल्यानंतर, तुम्ही तुमच्या एनपीएस खात्यामध्ये आणखी गुंतवणूक करू शकत नाही किंवा वेगळे आंशिक पैसे काढू शकत नाही.

ही सुविधा सक्रिय केल्यानंतरही, त्यात बदल करणे किंवा रद्द करणे शक्य आहे.

वर नमूद केलेली सक्रियकरण प्रक्रिया एनएसडीएलद्वारे नोंदणी करणाऱ्या सदस्यांसाठी आहे. परंतु ही प्रक्रिया मुख्यत्वे सीएएमएस आणि केफिनटेकसारख्या सेवा प्रदात्यांद्वारे सामील होणाऱ्या सदस्यांसाठी समान आहे.

**फायदा कोणाला होईल?**

ही सुविधा अशा गुंतवणूकदारांसाठी फायदेशीर आहे ज्यांना निवृत्तीनंतर स्थिर आणि करमुक्त उत्पन्न हवे आहे. या सुविधेचा वापर करून तुम्ही तुमचे गुंतवलेले पैसे दीर्घकाळ टिकवून ठेवू शकता. इतर म्युच्युअल फंड योजनांच्या तुलनेत, एनपीएसचे अत्यंत कमी एक्सपेन्स रेशो ही गुंतवणूक वेगाने वाढविण्यात मदत करते. याशिवाय, एसएलडब्ल्यूचा वापर करून, निवृत्तीनंतरच्या वार्षिक उत्पन्नामध्ये नियमित उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत देखील जोडला जाऊ शकतो.

## अस्थिरता कायम

तीन जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यामध्ये भारतीय शेअर बाजाराने पुन्हा एकदा तेजीचे निशाण फडकावत विसावा घेतला आहे. सलग दोन आठवड्यांच्या वृद्धीमुळे गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे. गतसप्ताहात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक असणाऱ्या सेन्सेक्समध्ये ५२४.०४ अंकांची म्हणजेच ०.६६ टक्क्यांची वाढ झाली आणि ७९२२३.११ या पातळीवर हा निर्देशांक विसावला; तर निफ्टी ५०मध्ये ०.८० अंकांची म्हणजेच १९१.३५ अंकांची वाढ होऊन हा निर्देशांक २४,००४.७५ अंकांवर बंद झाला. गेल्या सप्ताहात मिडकॅप समभागांमध्ये जोरदार खरेदी दिसून आल्याने मिडकॅप इंडेक्स २ टक्क्यांनी वधारला. तथापि, ऑटोक्षेत्राच्या निर्देशांकाने बाजाराचा टॉपर होण्याचा मान मिळवला. या निर्देशांकामध्ये ४ टक्क्यांची वाढ दिसून आली. दुसरीकडे बँक निफ्टी आणि रियल्टी इंडेक्समध्ये घसरण पहायला मिळाली.

गतसप्ताहाचे एक वैशिष्ट्य म्हणजे सलग दुसऱ्या आठवड्यात तेजी दिसून आली असली तरी गुंतवणूकदार सावध पवित्रा घेत आहेत यावरही शिक्कामोर्तब होत आहे. विशेषतः अमेरिकेतील सत्ताबदल जसजसा जवळ येत आहे तसतशी जागतिक राजकारण आणि अर्थकारणातील अनिश्चितता वाढण्याचे संकेत मिळू लागले आहेत. त्यामुळेच गुंतवणूकदार फार मोठी जोखीम घेण्याच्या पवित्र्यात दिसत नाहीयेत. गेल्या आठवड्यात

वेध बाजाराचा




निफ्टी५० च्या साप्ताहिक समाप्तीच्या दिवशी म्हणजेच गुरुवारी बाजारात जोरदार खरेदी झाली. एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीजसह जवळपास सर्वच दिग्गज कंपन्यांच्या समभागांनी गुरुवारी उसळी घेतली आणि निफ्टी २४२०० च्या पुढे जाऊन २४१८९ वर बंद झाला; परंतु शुक्रवारच्या दिवशी झालेल्या नफावसुलीमुळे आणि विक्रीच्या माऱ्यामुळे पुन्हा निफ्टीसह अन्य निर्देशांकात मोठी घसरण झाली. असे असले तरी नव्या वर्षातील पहिला आठवडा हिरवे निशाण फडकावत बंद झाला, ही सकारात्मक बाब म्हणावी लागेल.

अमेरिकन डॉलरची मजबुती, बाजारातील समभागांचे अद्यापही वधारलेल्या स्थितीतील मूल्य आणि गुंतवणूकदारांचा मल्टि असेट रणनीतीकडे असणारा कल यामुळे बाजारावर दबाव दिसून येत आहे. डिसेंबर महिन्यातील वाहनविक्रीचे आकडे दमदार आल्यामुळे ऑटोमोबाईल क्षेत्राने अन्य निर्देशांकांना बगल देत उसळी घेतली. मागील वर्षी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी केलेली तुफानी विक्री पाहता नव्या वर्षात एफआयआयचा कल बदलेल असे वाटत होते. परंतु पहिल्या आठवड्यात तरी तसे कसलेही संकेत दिसून आले नाहीत. शुक्रवारी एफपीआयकडून ४००० कोटींहून अधिक समभागांची विक्री भारतीय बाजारात झाली.


या पार्श्वभूमीवर चालू आठवड्यात आणि नजिकच्या भविष्यात बाजाराची दिशा काय राहील याचा विचार करता, कोअर सेक्टरमधील सुधारणांचे संकेत बाजारासाठी सकारात्मक ठरणारे आहेत. २०२५ मध्ये अमेरिकेतील फेडरल रिझर्व्हकडून होणारी संभाव्य दरकपात बाजारासाठी बूस्टर ठरू शकते. याखेरीज तिसऱ्या तिमाहीचे निकाल बाजारासाठी महत्त्वाचे असणार आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मोदी ३.० सरकारचा केंद्रीय अर्थसंकल्प आता तीन आठवड्यांवर येऊ ठेपला आहे. त्यामुळे गुंतवणूकदार आपल्या पोर्टफोलियोमध्ये फेरबदल करत असतात. या सर्वांचे परिणाम येत्या काळात बाजारावर दिसून येतील. याखेरीज अमेरिकेतील नॉन-फार्म पेरोल आणि बेरोजगारी दराचे आकडे बाजाराची दिशा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. याखेरीज कच्च्या तेलाच्या दरांमध्ये झालेली मोठी वाढ बाजारासह भारतीय अर्थव्यवस्थेसाठी काळजीची ठरणारी आहे.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास २४ हजारांची पातळी पार करून निफ्टी वीकली चार्टवर बंद झाला असला तरी बाजाराचा ट्रेंड अद्यापही बुलिश किंवा तेजीचा झालेला नाहीये. निफ्टी ५० निर्देशांक २४२२६ या गुरुवारच्या उच्चांकी पातळीच्या वर बाजार स्थिरावल्यास २४४०० ते २४५०० पर्यंत निफ्टी वधारू शकतो. याउलट २४ हजारांखाली घसरल्यास २३९३०-२३८४० पर्यंतची घसरण दिसू शकते. विक्रीचा मारा जोरदार राहिल्यास २३७०० पर्यंतची पडझडही दिसू शकते.

शुक्रवारी अमेरिकन बाजारात जोरदार तेजी दिसून आली आहे. नॅसडॅक ३४० अंकांनी वधारला आहे; तर एसअँडपीमध्येही ७३ अंकांची वाढ झाली आहे. त्यामुळे सोमवारची बाजाराची सुरुवात तेजीने होण्याची शक्यता आहे; परंतु जागतिक अस्थिरता आणि डॉलरचे वधारणे तसेच ट्रम्प यांच्या आगमनापूर्वीची एकंदरीतच धास्तीजन्य परिस्थिती यामुळे वरच्या पातळीवर बाजार टिकतात हे पाहणे महत्त्वाचे आहे.

अशा स्थितीत समभागांचा विचार करायचा झाल्यास चांगल्या आणि दिग्गज कंपन्यांच्या समभागांची निवड करणे हिताचे राहील. फार्मा क्षेत्रातील समभाग सध्या बुलिश आहेत. त्यामुळे यातील समभागांची निवड मध्यमकाळासाठी चांगला परतावा देणारी ठरू शकते. उदाहरणार्थ, हिंदुस्थान ॲरोनॉटिक्सारखा समभाग ४७०० चे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. जे. के. सिमेंटचा समभाग ५३०० चे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. ऑटो आणि फार्मा, तसेच आयटी या क्षेत्रांमध्ये केलेली गुंतवणूक अल्पावधित चांगला परतावा देणारी ठरू शकते. एचपीसीएलचा समभाग ४०० ते ४१५ रुपयांसमीप खरेदी करुन ५४० रुपये लक्ष्य ठेवता येईल. बाजारातील घसरणीच्या काळात इन्फोसिस, टीसीएस, एचडीएफसी बँक, एसबीआय, बँक ऑफ बडोदा, ॲक्सिस बँक, टाटा पॉवर, टाटा मोटर्स, जेएसडब्ल्यू स्टील, आयसीआयसीआय बँक यांसारख्या समभागांमध्ये खरेदीची संधी निश्चितपणाने साधता येईल. मागील स्तंभात म्हटल्यानुसार जानेवारी हा महिना फार चांगला परतावा देणारा ठरला असे इतिहासातील आकडेवारी दर्शवत नाही. तशातच २० जानेवारी रोजी डोनाल्ड ट्रम्प विराजमान झाल्यानंतर आणि होईपर्यंत बाजाराला अनेक प्रकारचे धक्के बसण्याच्या शक्यता आहेत. त्यांचा विचार करता आपली जोखीम क्षमता किमान पातळीवर आणून रणनीती अवलंबाली.

## वाहनउद्योग सुसाट



काही महिन्यापासून वाहन विक्रीवर परिणाम झाला असला तरी सरलेल्या संपूर्ण वर्षामध्ये तब्बल ४३ लाख घाऊक प्रवासी वाहन विक्री झाली. गेल्या वर्षी ४१.१० लाख प्रवासी वाहन विक्री झाली होती. यामध्ये जवळजवळ साडेचार टक्के वाढ झाली आहे, असे वाहन उद्योगाकडून सांगण्यात आले. या सकारात्मक आकडेवारीचा शेअर बाजारावरही गुरुवारी सकारात्मक परिणाम झाला आणि तेजीचे नेतृत्व वाहन कंपन्यांनी केले. मारुती सुझुकी, हुंदाई, टाटा मोटर्स, टोयोटा किर्लोस्कर मोटार, किया इंडीया या सर्वच कंपन्यांनी सरलेल्या वर्षामध्ये विक्रमी वाहन विक्री केली असल्याची आकडेवारी समोर आली आहे. डिसेंबरपर्यंत वाहन विक्री फारसे वाढत नव्हती. मात्र डिसेंबर महिन्यात वाहन विक्री वाढल्याचे आकडेवारी बुधवारी जाहीर झाली होती.

या आकडेवारी बद्दल समाधान व्यक्त करताना मारुती सुझुकी इंडिया कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी पार्थिव बॅनर्जी यांनी सांगितले की, मारुती सुझुकी कंपनीच्या विक्रीत सरलेल्या वर्षात वाढ होऊन ही विक्री १७,९०,९७७ युनिट झाली आहे. जी की करोनापूर्वी म्हणजे २०१८ मध्ये १७,५१,९१९ युनिट होती. त्याच प्रमाणात कंपनीची किरकोळ विक्री वाढली आहे, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा यांनी सांगितले की, सरलेल्या वर्षाप्रमाणेच आगामी काळातही एकूण वाहन विक्री वाढून ४३ लाख युनिट पर्यंत होण्याची शक्यता आहे. गेल्या चार वर्षापासून टाटा मोटर्सची विक्री एकतर्फी वाढत आहे. २०२४ मध्ये टाटा मोटर्सची झालेली विक्री विक्रमी आहे. डिसेंबर महिन्यातही टाटा मोटर्सच्या विक्रीत समाधानकारक वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

टोयोटो किर्लोस्कर मोटार कंपनीने २०२४ मध्ये ३,२६,३२९ वाहने विकली. गेल्या वर्षी या कंपनीने २,३३,३४६ वाहने विकली होती. म्हणजे एका वर्षात या कंपनीची वाहन वाहन विक्री ४०% वाढली आहे. आमच्या एसयूव्ही वाहनांना मागणी कायम आहे असे कंपनीचे उपाध्यक्ष शबरी मनोहर यांनी सांगितले.

किया इंडिया मोटार कंपनीचे उपाध्यक्ष हार्दिक सिंह ब्रार यांनी सांगितले की, सरलेल्या वर्षात आमच्या विक्रीत सहा टक्के वाढ होऊन २,५५,०३८ युनिट विक्री झाली आहे. देशातील सर्व राज्यातून चांगला प्रतिसाद मिळत असून आगामी वर्षात आमची विक्री अपेक्षा जास्त प्रमाणात वाढण्याबाबत आम्हाला खात्री आहे.

**ग्रामीण भागातून मागणी वाढली ह**

मारुती सुझुकीने जारी केलेल्या माहितीनुसार सरलेल्या वर्षात आणि डिसेंबर महिन्यामध्ये ग्रामीण भागातून मागणी वाढल्यामुळे वाहन कंपन्यांच्या घाऊक आणि किरकोळ विक्रीत वाढ होण्यास मदत झाली असल्याचे दिसून येते. डिसेंबर महिन्यामध्ये मारुती सुझुकीची ग्रामीण भागामध्ये १६ टक्के जास्त वाहन विकली. संपूर्ण तिसर्या तिमाहित ग्रामीण भागातून चांगली मागणी आल्यामुळे कंपनीची आकडेवारी सकारात्मक आहे चांगला पाऊस आणि कृषी उत्पादनांना चांगला भाव यामुळे ग्रामीण भागातून मागणी वाढली आहे.

## 'आयुष्मान भारत' योजनेसाठी नोंदणी कशी कराल?




**केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांविषयी आजही बहुतेकांना एकतर माहिती नसते किंवा त्यासाठीच्या अर्ज प्रक्रियेविषयी ते अनभिज्ञ असतात. याचा परिणाम म्हणजे या योजनांच्या लाभांपासून वंचित राहावे लागते. आयुष्मान भारत योजनेबाबतही अनेक ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणीच न केल्याचे दिसून आले आहे.**

पीएमजेएवाय अर्थात आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना समाजातील असुरक्षित घटकांसाठी आणि ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी वार्षिक ५ लाखांपर्यंतचा मोफत आरोग्य विमा देते. यामध्ये उत्पन्न मर्यादेची कसलीही अट नाहीये. या योजनेत नावनोंदणी कशी केली जाते याविषयी अनेकांना माहिती नसते. त्याविषयी...

जाणून घ्या


**अर्ज डाउनलोड करा**

ज्येष्ठ नागरिक किंवा त्यांचे कुटुंबीय गुगल प्ले स्टोअरवरुन किंवा अधिकृत वेबसाइटवरून आयुष्मान भारत ॲप डाउनलोड करू शकतात. त्यानंतर पुढे जाण्यासाठी आपल्या सोयीची भाषा निवडावी. यानंतर लाभार्थी म्हणून लॉगिन करा. या पर्यायावर 'कॅप्चा' आणि मोबाइल नंबर टाकून क्लिक करणे आवश्यक आहे. मोबाईल नंबरवर पाठवलेला ओटीपी (वन टाईम पासवर्ड) टाका. लॉग इन केल्यानंतर, ज्येष्ठ नागरिकांच्या नावनोंदणीसाठी होम स्क्रीनच्या तळाशी जा. तेथे आधार क्रमांक एंटर करा आणि नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर पाठवलेला ओटीपी वापरून त्याचे प्रमाणीकरण करा.

यानंतर, निवासस्थान प्रविष्ट करा. 'कॅप्चा' प्रविष्ट केल्यानंतर, एक शोध पर्याय सक्रिय केला जातो, ज्यावर क्लिक केल्यानंतर ज्येष्ठ नागरिक योजनेत आपले नाव आधीच नोंदणीकृत आहे की नाही हे तपासले जाते. आपले नाव नसल्यास ज्येष्ठ नागरिकाने नव्याने नावनोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. इथे ओटीपी पडताळणीची आणखी एक फेरी पार पडेल. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांना पडताळणीसाठी त्यांचा लाइव्ह फोटो क्लिक करण्याची सूचना दिसेल. हा फोटो काढून झाल्यानंतर ओटीपी पडताळणीसाठी मोबाइल नंबर, शहर, राज्य, पत्ता, प्रभाग तपशील, पिन कोड इत्यादी तपशील प्रविष्ट करणे आणि सबमिट करणे आवश्यक आहे. एकदा सर्व तपशील प्रविष्ट केल्यानंतर, वापरकर्ता मंजुरीसाठी अर्ज सबमिट करू शकतो. एकदा मंजूर झाल्यानंतर, लाभार्थीला आयुष्मान कार्ड जारी केले जाते. हे कार्ड जपून ठेवणे आवश्यक आहे. कारण या कार्डच्या आधारे ज्येष्ठ नागरिक या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

## साखर उत्पादन घटले!

ऑक्टोबर ते डिसेंबर या तीन महिन्यांमध्ये भारतातील साखर कारखान्याचे उत्पादन १६ टक्क्यांनी कमी होऊन ९५.४० लाख टन झाले आहे. भारतातील साखर कारखान्याचे उत्पादन ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होते. पहिल्या काही महिन्यांमध्ये साखर उत्पादन पुरेसा वेग घेत नाही. महाराष्ट्रातील साखर उत्पादन या तीन महिन्यात बरेच कमी झाल्यामुळे एकूण साखर उत्पादनावर नकारात्मक परिणाम झाला असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.



गेल्या वर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत साखर कारखान्यांनी ११३ लाख टन साखरेचे उत्पादन केले होते. या आकडेवारीमध्ये इथेनॉलसाठी वळविलेल्या साखरेला विचारात घेतले जात नसल्याचे साखर कारखानदारांच्या संघटनेने या संदर्भात सांगितले आहे. इंडियन शुगर अँड बायोएनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन या संघटनेने ही आकडेवारी जारी करताना सांगितले की, विविध राज्यांमध्ये सुरुवातीच्या तीन महिन्यांमध्ये ज्या प्रमाणात उसाचा पुरवठा होणे अपेक्षित होते त्या प्रमाणात ऊसाचा पुरवठा न झाल्यामुळे साखर कारखान्याच्या उत्पादकतेवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. विशेषतः डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये उत्तर प्रदेशातील साखर कारखान्यांना त्यांच्या क्षमतेइतका ऊस मिळाला नसल्यामुळे उत्पादनावर परिणाम झाला आहे.

गेल्या वर्षी डिसेंबर अखेरपर्यंत ५१२ साखर कारखान्यात साखरेचे उत्पादन सुरु झाले होते. यावर्षी आतापर्यंत ४९३ साखर कारखान्यात साखरेचे उत्पादन सुरू झाले आहे. महाराष्ट्र हे साखर उत्पादन करणारे सर्वात मोठे दुसरे राज्य आहे. या राज्यात या तिमाहीत साखर उत्पादन कमी होऊन केवळ ३० लाख टन झाले आहे. गेल्या वर्षी या तिमाहीत महाराष्ट्रात ३८.२० लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते.

*रिअल्टी सेक्टरमध्ये गुंतवणुकीची इच्छा बाळगून असणारे सामान्य नागरिक फार तर घर, दुकान किंवा ऑफिसची जागा यापुरतीच गुंतवणुकीचा विचार करतात. पण बजेट चांगले असेल तर अशावेळी सामान्य गुंतवणुकीपेक्षा वेगळा विचार करण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत भारतात औद्योगिक रिअल इस्टेट बाजाराचा वेगाने विकास झाल्याचे सर्वांनाच ठाऊक आहे. ई कॉमर्स, कारखाने, उत्पादन आणि लॉजिस्टिक सेक्टरच्यां विकासाने एकप्रकारे औद्योगिक मालमत्तेत गुंतवणुकीच्या संधी वाढल्या आहेत. अशावेळी तुम्हीही पारंपरिकरित्या गुंतवणुकीपेक्षा वेगळ्या स्वरुपाच्या गुंतवणुकीचा विचार करू शकता. तुम्ही देखील औद्योगिक मालमत्तेत गुंतवणुकीचा विचार करत असाल तर त्यातील लाभ आणि जोखीम लक्षात घ्यायला हवेत.*



रिअल इस्टेट

## इंडस्ट्रियल रिअल्टी इस्टेट गुंतवणुकीचा नवा पर्याय

**इंडस्ट्रियल मालमत्तेचे फायदे :** औद्योगिक रिअल इस्टेटमधील गुंतवणुकीत अनेक सकारात्मक बाजू असल्याने गुंतवणूकदार या क्षेत्राकडे आकर्षित होत आहेत. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे वाढलेली मागणी. भारतात ई कॉमर्स आणि उत्पादन क्षेत्राचा विकास झाल्याने औद्योगिक रिअल इस्टेटच्या मागणीत वाढ झाली आहे. एका अंदाजानुसार २०२५ पर्यंत भारतात वेअरहाऊसिंगच्या मागणीत ५०० दशलक्ष चौरस फुटापर्यंत वाढ होऊ शकते. २०२१ पासून लॉजिस्टिक सेक्टरमध्ये गुंतवणूक ही दरवर्षी २० टक्के दराने वाढत आहे. या क्षेत्रातील वाढती मागणी ही गुंतवणुकदारांना कायम परतावा मिळण्याची हमी देते. कोरोना काळ वगळता या सेक्टरने गुंतवणूकदारांना चांगले उत्पन्न मिळवून दिले आहे.

**दीर्घकाळासाठी भाडेकरू :** औद्योगिक मालमत्ता भाड्याने देण्याचा कालावधी हा साधारणपणे दहा ते पंधरा वर्षांचा असतो. भारतात लॉजिस्टिक्स कंपन्या आणि मॅन्यूफॅक्चरिंग युनिट्स या साधारणपणे दीर्घकाळासाठी भाडेकरार करतात. अशावेळी गुंतवणुकदारांना स्थिर आणि नियमित उत्पन्न मिळत राहाते. शिवाय अनेक कंपन्या भाड्याने जागा घेण्यापूर्वी एक वर्षाची आगाऊ भाडेही मालकाकडे जमा करते. हीच एकरकमी पैसे अन्यत्र गुंतवणूक केल्यास त्यातून फायदा पदरात पाडता येऊ शकतो. याशिवाय 'ट्रिपल नेट लीज'मुळे देखभालीची जबाबदारी भाडेकरूंवर होते. ट्रिपल नेट लीज (एनएनएन) हा एक व्यावसायिक करार असून त्यानुसार भाडेकरू भाडे आणि नियमित खर्चाशिवाय मालमत्तेच्या देखभालीची जबाबदारी देखील उचलतो.

**ई कॉमर्सचा प्रभाव :** भारतात ई कॉमर्सचा बाजार २०२६ पर्यंत २०० अब्ज डॉलरपर्यंत पोचण्याचा अंदाज आहे. या क्षेत्रातील विकासामुळे वेअरहाऊसिंग आणि फुलफिलमेंट सेंटरच्या मागणीत वाढ झाली आहे. टियर-२ आणि टियर-३ शहरात देखील कंपन्यांकडून वेअरहाऊसची उभारणी केली जात आहे. परिणामी औद्योगिक मालमत्तेत गुंतवणुकीची संधी वाढली आहे. मोकळी जमीन (एनए) भाड्याने दिल्यास मालकाला उत्पन्न सुरू होते.

**देखभालीवरचा कमी खर्च :** औद्योगिक मालमत्तेवरचा देखभालीचा खर्च कमी असतो. बहुतांश औद्योगिक करारात भाडेकरू हा स्वत:च देखभालीची जबाबदारी घेतो. ही बाब गुंतवणुकदारांसाठी फायद्याची आहे. कारण त्यांना वारंवार दुरुस्ती आणि नुतनीकरण करण्याची गरज भासत नाही. याशिवाय वार्षिक देखभालीपोटी वेगळा खर्च करण्याची आवश्यकता भासत नाही.

**वैविध्यपणा आणि स्थैर्य**

औद्योगिक रिअल इस्टेटमध्ये वेअरहाऊस, मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स, लॉजिस्टिक सेंटर, ऑफिस स्पेस आणि फुलफिलमेंट सेंटर यासारखे विविध पर्याय उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील वैविध्यपणा हा गुंतवणुकदारांची जोखीम संतुलित करण्याचे काम करतो. त्याचबरोबर मागणीत स्थिरता असल्याने औद्योगिक मालमत्तेच्या किंमतीत काळानुसार वाढ होत जाते.

**आव्हाने आणि जोखीम**

औद्योगिक रिअल इस्टेटमधील गुंतवणुकीत काही जोखीम देखील आहेत आणि याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आव्हाने आणि जोखमीबाबत जाणून घेऊ.

भाडेकरूची जोखीम: एखादा भाडेकरू आर्थिक अडचणीत असेल आणि तो भाडे देण्यास समर्थ नसेल तर गुंतवणुकदाराचे नुकसान होऊ शकते. कोरोना काळात अनेक कंपन्यांच्या लॉजिस्टिक्सच्या खर्चात कपात करावी लागली आणि त्यामुळे काही भाडेकरूंनी भाडेकरार रद्द केला. मालमत्ता रिकामी राहण्याची जोखीम: औद्योगिक मालमत्तेत दीर्घकाळापर्यंत भाडयाने दिल्यानंतर नव्याने भाडेकरू शोधण्यात बराच वेळ लागलू शकतो. शिवाय त्याचा शोध घेणे आव्हानात्मक राहू शकते. प्रामुख्याने मालमत्तेला एखाद्या विशेष उद्योगासाठी तयार केले असेल तर नव्या भाडेकरूच्या मागणीनुसार त्यात बदल करणे खर्चिक राहू शकते. अधिक उपलब्धतेची भिती: भारतात मेट्रो शहरातील औद्योगिक वेअरहाऊसिंगची मुबलक उपलब्धता राहू शकते. एकाच क्षेत्रात गरजेपेक्षा अधिक औद्योगिक मालमत्ता असेल तर भाड्यात घट होऊ शकते. याशिवाय काही कंपन्या कमी कर असणाऱ्या राज्यांत शिफ्ट झाल्यास वेअरहाऊस धुळखात पडून राहू शकते.




गोविंदपुरा येथे गुरु गोविंद सिंग यांच्या ३५८ व्या जयंतीनिमित्त जिल्हा पोलिस प्रमुख राकेश ओला यांनी गुरुद्वारास भेट देत दर्शन घेतले. (छाया – लहू दळवी)

# गोविंदपुरा येथे गुरु गोविंद सिंग यांची ३५८ वी जयंती साजरी

नगर – गोविंदपुरा गुरुद्वाराभाई दयासिंगजी येथे शीख, पंजाबी, सिंधी समाजाने एकत्र येऊन विविध धार्मिक कार्यक्रमाने दहावे गुरु, गुरु गोविंद सिंग यांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्त जगाच्या शांततेसाठी प्रार्थना केली व धार्मिक गीत गायन, अखंड पाठ, भजन किर्तन, कथा आयोजित करण्यात आले होते. यावेळी गुरुगोविंद सिंग यांच्या जीवन संदर्भात माहिती दिली. गुरुगोविंद सिंग कोण होते. यासंदर्भात त्यांच्या वडिलांचे नाव गुरु तेग बहादुर होते आणि ते शीखांचे नववे गुरु होते. त्यांच्या मृत्यूनंतर गुरु गोविंद सिंग शीख धर्माचे दहावे गुरु बनले. गोविंद सिंग यांचा जन्म २२ डिसेंबर १६६६ मध्ये पटना बिहार मध्ये झाला. त्यांचा जन्मदिवस गुरुंच्या जन्म उत्सव नानकशाही कॅलेंडरवर आधारित आहे. या वर्षी गुरु गोबिंद सिंग जयती ६ जानेवारी म्हणजेच आज सर्वत्र साजरी केली जात आहे. गुरु गोबिंद सिंह नी संत–सैनिकांच्या खालसा दलाची स्थापना १६९९ मध्ये केली होती. ते जातिवाद आणि अंधविश्वास यांच्यावर विश्वास ठेवत नसे आणि कोणी यावर विश्वास ठेवू नये असे त्यांचे म्हणणे होते. गुरुगोविंद सिंग यांच्या जयंतीनिमित्त महाप्रसादचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आ. संग्राम जगताप, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांनी गुरुद्वाराला भेट देत दर्शन घेतले, समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान गुरुद्वाराचे हेड ग्रंथीभाई गुरुभेदसिंग हजुरी, जयाभाई समरथसिंगजी व अमृतसरचे भाई सुखप्रीत सिंग साज यांनी भाविकांना कीर्तनाने मंत्रमुग्ध केले, बोले सो निहाल, सतसीअकाल व वाहे गुरुजी का खालसा, वाहे गुरुजी कि फतेहच्या गर्जनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# रेल्वे स्थानकाचे नाव बदलून अहिल्यानगर करण्यात यावे

### सेंट्रल रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांना निवेदन

नगर – शहरातील रेल्वे स्थानकाचे नाव बदलून अहिल्यानगर करण्याची मागणी भाजप रेल्वे बोर्डाचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक यांनी सेंट्रल रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. रेल्वेचे महाप्रबंधक मीना यांनी भारतातील सर्व रेल्वे स्टेशनला पत्र पाठवून नामांतरची प्रक्रिया सुरु झालेली असून, लवकरच नवीन नाव लावले जाणार असल्याचे आश्वासन दिले.



रेल्वे स्थानकाचे नाव बदलून अहिल्यानगर करावे, या मागणीचे निवेदन सेंट्रल रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांना देताना भाजप रेल्वे बोर्डाचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक आदी.

नगरच्या रेल्वे स्थानकावर आलेले रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांना निवेदन देऊन झालेल्या नामांतराबाबत सबलोक यांनी लक्ष वेधले. राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे अहमदनगर हे नाव बदलून आता अहिल्यानगर झाले आहे. त्याला केंद्र सरकारने देखील मंजुरी दिलेली आहे. लवकरात लवकर अहमदनगर रेल्वे स्टेशनचे नाव बदलून अहिल्यानगर करावे अशी मागणी केली आहे.

# महापालिकेचे स्वच्छता अभियान सुरू; स्टेट बँक चौक ते कोठी चौकात स्वच्छता

### प्लास्टिकचा वापर टाळावा, कापडी पिशव्या वापराव्यात; अभियानात सहभागी होण्याचे आयुक्त यशवंत डांगे यांचे आवाहन

नगर – महानगरपालिकेचे शहर स्वच्छता अभियान शनिवारपासून सुरू करण्यात आले आहे. शनिवारी स्टेट बँक चौक ते कोठी चौक दरम्यान स्वच्छता अभियान पार पडले. यात कचऱ्यासह प्लास्टिक, मातीचे ढीग उचलून साफसफाई करण्यात आली.




नव्या वर्षात शहर स्वच्छतेसाठी महानगरपालिकेने संकल्प केला आहे. अहिल्यानगर शहर स्वच्छ शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी नागरीक, सामाजिक संघटनांच्या सहकार्यातून, सहभागातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. प्रत्येक शनिवारी शहर व उपनगराच्या एकेका भागात हे अभियान राबविण्यात येणार आहे. शनिवारी महानगरपालिकेने स्टेट बँक चौक ते चांदणी चौक दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या भागात अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली होती. यात या रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविली होती. त्यामुळे या भागात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. रस्त्यावर पडलेला कचरा, माती व बांधकाम व पाडकामाचा कचरा उचलून परिसर स्वच्छ करण्यात आला. रस्त्याच्या दुभाजकाच्यामध्ये साचलेला प्लॅस्टिक कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली. अभियानात नागरीक सहभागी झाले होते.

नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन करतानाच शहर स्वच्छतेसाठी सुरू करण्यात आलेल्या उपक्रमात नागरीक, सामाजिक संघटनेने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

# खेळामुळे निर्णय क्षमता, नेतृत्व क्षमता वाढते

### डॉ. भाऊसाहेब सोनवणे यांचे प्रतिपादन; केडगावच्या सरस्वती विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

नगर – खेळामुळे निर्णय क्षमता, नेतृत्व क्षमता वाढते. या सोबतच भावनिक विकासही होतो. त्यामुळे खेळात सहभागी व्हायला हवे. स्पर्धेमध्ये शिस्त दाखवा, स्वतःमध्ये सांघिक भावना विकसित करा, अपयश आले की खचून न जाता जिद्दीने परत उभे राहून पुढे जाण्याची तयारी करण्याचे प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनवणे यांनी आवाहन केले.



केडगावच्या सरस्वती विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात साजरा.

केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विविध कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धेसह स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनवणे हे होते. प्रा.डॉ. अरुणराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सहकोषाध्यक्ष प्रा.डॉ. रावसाहेब पवार, बीएड कॉलेजचे प्राचार्य अमरनाथ कुमावत, संस्था समन्वयक डॉ. रवींद्र चोभे, प्रज्ञाताई आसनीकर, माजी नगरसेवक संभाजीराजे पवार, सावेडी शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी काजळे, शाळेचे मुख्याध्यापक संदिप भोर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी, पालक प्रतिनिधी स्वातीताई कोळपळकर, विद्यार्थी प्रतिनिधी यशराज पाचारणे, विद्यार्थिनी प्रतिनिधी दिया काकडे, अविनाश साठी, शिवाजी मगर आदींसह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

जिल्हास्तरावर सुवर्ण, रौप्य, कास्य पदक पटकावून विभागीयस्तरावर यश प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह त्यांच्यातील कलागुण विकसीत करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे उपस्थित पाहुण्यांनी कौतुक करुन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन स्मिता खिलारी व अनिता क्षीरसागर यांनी केले. सुरेखा कसबे यांनी आभार मानले.

# अहमदनगर पहिली मंडळीच्यावतीने आनंद मेळाव्याने ख्रिस्तजन्मोत्सवाची सांगता

नगर – ख्रिस्त जन्मोत्सव हा सर्व जगभर मोठ्या आनंदाने साजरा करण्यात येत असतो. या आनंदी क्षणी सर्वांनी एकत्रित येऊन विचारांची देवाण–घेवाण केली पाहिजे. आजच्या आनंद मेळाव्याच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येऊन विविध उपक्रमात सहभागी होत हा उत्सव आनंदाने साजरा केला आहे. अशा उपक्रमातून जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होत असतो. यामुळे येणारा काळात आपण अडचणीवर मात कराल. मेळाव्यातून जो आनंद सर्वांना मिळाला आहे, तो वर्षभर पुरणारा आहे. हे नवीन वर्ष सर्वांच्या जीवनात आनंद निर्माण करेल, अशी शुभकामना रेव्ह.अभिजित तुपसुंदरे यांनी व्यक्त केली.



अहमदनगर पहिली मंडळी नाशिक धर्मप्रांत (सी.एन.आय.) च्यावतीने ख्रिस्तजन्मोत्सव २०२४ निमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – यतीन कांबळे)

अहमदनगर पहिली मंडळी नाशिक धर्मप्रांत (सी. एन.आय.)च्यावतीने ख्रिस्तजन्मोत्सव २०२४ निमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याप्रसंगी रेव्ह. अभिजित तुपसुंदरे आदिंसह सर्व कमिटीचे मेंबर्स, तरुण संघ, महिला मंडळ, संडे स्कूलचे शिक्षक, विद्यार्थी सर्व सन्मानिय सभासद उपस्थित होते.

या आनंद मेळाव्यात लहान मुलांसाठी रनिंग, फुगे फोडणे, लिंबू चमचा तर महिलांसाठी संगित खुर्ची, स्लो मोपेड, कपल्ससाठी सुई–दोरा ओवणे, पुरुषांसाठीही अशाच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांसाठी विविध प्रकारच्या खाद्यांचे स्टॉल लावण्यात आले होते, त्यांचा आनंद सर्वांनी लुटला.

यावेळी केक कापण्यात येऊन फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह. अभिजीत तुपसुदरे, सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. बिनीत गायकवाड, रविद्रं लोंढे, सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, सौ. शोभना गायकवाड, सौ. वंदना शिंदे, सौ. कांदबरी सुर्यवंशी, सौ. शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे या कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले.

तसेच कौतुकास्पद परिश्रम चर्चचा तरुण संघाने घेतले महिला मंडळ, चर्च सभासद यांचे सहकार्य लाभले.

# मुदतीत कर्जाची परतफेड न केल्याने कर्जदारास ४ महिने सश्रम कारावास

### कर्ज रक्कम व दंडापोटी ५ लाख २० हजार एका महिन्यात भरण्याचे आदेश

नगर – व्यवसाय वाढीसाठी घेतलेल्या कर्जाची रक्कम विहित मुदतीत परतफेड न करणाऱ्या कर्जदाराला नगरच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश तेजस्विनी निराळे यांनी ४ महिने सश्रम कारावासाची तसेच कर्ज रक्कम व दंडापोटी ५ लाख २० हजार एका महिन्यात संस्थेकडे भरण्याचे आदेश दिले आहेत. पोपट बाळासाहेब शेवाळे (रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) असे या कर्जदाराचे नाव आहे.

कर्जदार शेवाळे यांनी लक्षवेध मल्टीस्टेट च्या पाईपलाईन रोड शाखेतून व्यवसाय वाढीसाठी ४ लाख रुपयांचे कर्ज दि.१९ मे २०२३ रोजी घेतले होते. या कर्जाची परतफेड करण्याची मुदत १०० दिवसांची होती. मात्र त्यांनी कर्ज घेतल्या पासून ४ महिने काहीही रक्कम भरली नाही. त्याने कर्ज परतफेडीसाठी संस्थेला ४ लाख ७५ हजारांचा धनादेश दिला. तो संस्थेने दि. १८ सप्टेबर २०२३ रोजी बँक खात्यात भरला असता कर्जदाराच्या बँक खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो न वटता परत आला. त्यामुळे संस्थेने शेवाळे यास नोटीस पाठविली.

मात्र त्याने त्यास काहीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे संस्थेचे वसुली अधिकारी सुभाष तुकाराम आरडे यांनी ॲड. आर.बी. गाली यांच्या मार्फत जिल्हा न्यायालयात कर्जदार पोपट शेवाळे याच्या विरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट १८८१ चे कलम १३८ नुसार दावा दाखल केला होता. त्यावर नगरच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश तेजस्विनी निराळे यांच्या समोर सुनावणी होवून न्या. निराळे यांनी कर्जदार शेवाळे यास दोषी धरत ४ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच कर्ज रक्कम व दंडापोटी ५ लाख २० हजार रुपये एका महिन्यात लक्षवेध मल्टीस्टेट या संस्थेकडे भरण्याचे आदेश दिले आहेत.

# नेहरू मार्केटची जागा अतिक्रमणमुक्त करून भाजी विक्रेत्यांना बसण्याची व्यवस्था करावी

### अहिल्यानगर हॉकर्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय झिंजे यांची मनपा आयुक्तांकडे मागणी

नगर – चितळे रोडवरील नेहरू मार्केटची प्रत्यक्ष पाहणी करून ती जागा अतिक्रमणमुक्त करून भाजीविक्रेत्यांना उपलब्ध करून देण्याची मागणी अहिल्यानगर हॉकर्स युनियनचे अध्यक्ष, माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेवून निवेदन दिले. त्यांच्यासमवेत चंद्रकांत उजागरे उपस्थित होते. आयुक्तांनी निवेदनाची दखल घेत प्रत्यक्ष पाहणीसाठी ७ जानेवारी रोजी येण्याचे आवश्वासन दिले आहे.



नेहरू मार्केटची जागा अतिक्रमणमुक्त करून तिथे भाजी विक्रेत्यांची व्यवस्था करावी, या मागणीचे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, नवीन वर्षांत आपल्या आदेशाने शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात येत आहे. शहराचा एक जबाबदार नागरिक म्हणून या मोहिमेचे स्वागतच आहे. त्याचवेळी शहरातील हॉकर्स युनियनचा अध्यक्ष म्हणून आपणासमोर काही वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे.

शहरातील चितळे रोडवरील ऐतिहासिक नेहरू मार्केटची इमारत १३ वर्षांपूर्वी नवीन मोठे संकुल बांधण्यासाठी भुईसपाट करण्यात आली. आज तेरा वर्षानंतर येथे काहीच झाले नाही. उलट ही जागा महापालिकेच्या धोरणात्मक निर्णयाच्या चुकीचे स्मारक बनली आहे. मनपाच्या मालकीची ही मोकळी जागा ना गाळेधारक भाजीविक्रेत्यांच्या उपयोगाची राहिली ना महापालिकेच्या कामाची राहिली. याठिकाणी सध्या अनेक अतिक्रमणे झाली आहेत. टपऱ्या टाकण्यात आल्यात. अनेक जण येथे कचरा आणून टाकतात. लघुशंका करण्यासाठी याच जागेचा उपयोग केला जातो. तसेच अनेकांच्या खाजगी चारचाकी, दुचाकी येथे पार्क केलेल्या असतात. संपूर्ण जागाच अतिक्रमणांनी गिळंकृत केली आहे. हे सर्व आपण प्रत्यक्ष पाहणी केल्यास लगेचच लक्षात येईल. मनपाचे अतिक्रमण विरोधी पथक चितळे रोडवरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई करीत आहे. वास्तविक एवढी मोठी मोकळी जागा असताना त्यांना नाईलाजाने रस्त्यावर बसावे लागत आहे. मनपाने या जागेवर पे ॲण्ड पार्क न करता ती जागा अतिक्रमण मुक्त करून दिल्यास भाजी विक्रेते तिथे बसण्यास तयार आहेत. त्यामुळे रस्ताही मोकळा होईल व वाहतुकीला अडथळाही होणार नाही. या जागेची व्यवस्थित साफसफाई करून सार्वजनिक स्वच्छतागृह बांधून द्यावे तसेच चारही बाजूंनी संरक्षक भिंत बांधून दिल्यास भाजी, फळ विक्रेत्यांचा मालही सुरक्षित राहिल. तसेच याठिकाणी लाईटचीही व्यवस्था करावी. त्यामुळे या जागेचा अनधिकृतपणे सुरु असलेला गैरवापरही थांबेल आणि भाजी विक्रेत्यांनाही हक्काची जागा मिळेल. पे ॲण्ड पार्क सारखे धोरण राबवून या परिसरातील वाहतुक कोंडीची समस्या सुटणार नाही हे वास्तव आहे. गोरगरीब भाजी, फळ विक्रेत्यांना न्याय मिळावा असे झिंजे यांनी म्हटले आहे.

## सावकारी व्यवहाराचे दप्तर जमा न केल्याने एकावर गुन्हा दाखल

नगर – उपनिबंधक सहकारी संस्था नगर तालुका यांनी रद्द केलेल्या सावकारी परवाना वरील व्यवहाराचे संपुर्ण दप्तर जमा करण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन ही सहाय्यक निबंधक कार्यालयात दप्तर जमा न केल्याप्रकरणी एका जणा विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी सचिन अदिनाथ ताठे (रा. सावेडी) यांचे सावकारी परवाना रद्द केलेला होता. त्यानंतर त्यांना दि. २३ सप्टेंबर २०२४ पासुन ते १ जानेवारी २०२५ रोजी पर्यंत या परवाना वरील व्यवहाराचे संपुर्ण दप्तर जमा करण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन तसेच १६ डिसेंबर २०२४ व १ जानेवारी रोजीच्या सुनावणी वेळी संधी देऊन ही त्यांनी दप्तर जमा केलेले नाही. त्यामुळे या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी अल्ताफ शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सचिन ताठे यांचे विरुध्द महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ मधील नियम ४६ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# रिक्षातून प्रवास करताना वृद्ध दाम्पत्याची ८५ हजार रुपयांची रोकड गेली चोरीला

नगर – बँकेत गहाण ठेवलेले सोने सोडविण्यासाठी पैसे घेऊन रिक्षातून निघालेल्या दांपत्याकडील ८५ हजाराची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. सावेडी उपनगरातील स्टेट बँकच्या शाखेपासून ते दिल्लीगेट दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी शनिवारी तोफखाना पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

शाम दत्तात्रय कुलकर्णी (वय ६३, रा. निर्मलनगर, भगवान बाबा चौक, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. गुरूवारी दुपारी सव्वा वाजता शाम व त्यांच्या पत्नी कल्पना सावेडी उपनगरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यांनी शाखेतून १ लाख १० हजार रूपये काढले व ते पैसे कापडी पिशवीमध्ये ठेवले. दरम्यान, त्यांना नवी पेठ येथील शहर सहकारी बँकेत गहाण ठेवलेले सोने सोडविण्यासाठी जायचे असल्याने ते एका रिक्षामध्ये बसून नवी पेठे येथे जाण्यासाठी निघाले.

पत्रकार चौकात रिक्षा आली असता तेथे दोन अनोळखी महिला व एक मुलगी रिक्षात बसली. शाम व त्यांची पत्नी दिल्लीगेट येथे उतरून पायी शहर सहकारी बँकेत गेले. तेथे गेल्यानंतर पिशवीतील पैसे पाहिले असता त्यातील थोड्याच नोटा शिल्लक असल्याच्या दिसून आल्या. त्यांनी त्या मोजल्या असता २५ हजार रूपये भरले. रिक्षा प्रवासात ८५ हजार रूपये चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# २ कत्तलखान्यावर पोलिसांचे छापे

नगर – शेवगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेल्या दोन कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी कारवाई करून ५ जणांना ताब्यात घेऊन त्याच्याकडील २ लाख ८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवारी (दि.५) करण्यात आली.

पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी जिल्हयातील अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अंमलदारांनी शेवगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेल्या गोवंश जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या दोन कत्तलखान्यांवर कारवाई केली. या कारवाईत अफवान इस्माईल कुरेशी (वय २७), मुझाहिद नुरमोहमंद कुरेशी (वय ३०), आरफाद अश्पाक कुरेशी (सर्व रा. रा.खाटीक गल्ली, शेवगाव), एक विधी संघर्षित बालक, बब्बु अजीज शेख, (वय ५५, रा.दादेगाव रोड, शेवगाव) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३१० किलो गोमांस, २ गायी, १ कालवड, १ वासरू व ४ सुरे असा २ लाख ८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात २ वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली.

